

# श्री साईलीला

फेब्रुवारी | किं ५० पैसे | १९६५

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे


मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विख्यात सुप्रसिद्ध पेढी

ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

श्री साईबाबांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झालेली शिरडी येथील द्वारकामाई ही आपली माता आहे. कोणतेंही संकट येवो. तिचें म्हणजे बाबांचे जो कोणी भक्ति-भावानें स्मरण व चिंतन करील तो संकटपार झाल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. तुमची त्या स्थानावर निष्ठा मात्र पाहिजे. ती माता अत्यंत कृपाळू आहे. भोळया भाविकांचें ती आश्रयस्थान आहे. तिच्या छायेच्या आश्रयाखालीं जो जो कोणी येईल तो सुखी झालाच पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४३ वें ] फेब्रुवारी १९६५ [ अंक ११ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०,

बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

साधुसंत म्हणजे देवाचेच अवतार. संतांच्या रूपानें प्रत्यक्ष परमेश्वर आमच्यांत वावरत असतो. जशी देवावर निष्ठा तशीच त्यांच्यावर आपली निष्ठा असावी लागते. साईबाबानीं आपल्या हयातींत या निष्ठेचे पडताळे अनेकांस अनेक परीनें आणून दिले आहेत.

एकदां काकासाहेब मिरीकर या नांवाचे बाबांचे परम भक्त शिरडीस त्यांच्या भेटीसाठीं आले. सरकारनें त्यांना सरदारकी बहाल केली होती, परंतु ते आपल्याच वैभवांत गुंग होऊन कधींही राहीले नाहींत. त्यांची देवधर्मावर निस्सीम श्रद्धा होती. सरदार मिरीकर यानीं द्वारकामाईंत जाऊन बाबांचे प्रेमभावानें दर्शन घेतलें. कुशल प्रश्न झाले. त्यांचा (मिरीकरांचा) भोळा व पवित्र भाव लक्षांत घेऊन बाबानीं त्यांना द्वारकामाईचें महत्व थोडक्यांत जाणाविलें. दर्शन घेऊन ते जावयास निघाले तेव्हां बाबानीं आपल्या हातांनीं विभुति दिली व आशिर्वादरूप आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर ठेविला.

त्याचवेळीं मिरीकर यांच्यावर येणाऱ्या भावी संकटांची बाबांना जाणीव झाली. आपल्या भक्तावर येऊं घातलेल्या संकटांची जाणीव होऊन ते थांबले नाहींत. त्यांना संकटमुक्त करण्याच्या तयारीस ते तात्काळ लागले. मिरीकर यांस भावी संकटाची कांहीं तरी पूर्वसूचना असावी या हेतूनें जातां जातां बाबा त्यांना म्हणाले, अहो! लांब बाबा कसा असतो माहीत आहे का तुम्हांला? तो फार भयंकर तसाच प्राणघातक असतो. तो बाबा कितीही भयंकर असला तरी आपलें काय करणार आहे! द्वारकामाईचा आश्रय ज्यानें घेतला त्याला कोण काय करणार? आपण द्वारकामाईचीं लेकरें आहोंत. ती आपल्या पाठीशीं असल्यावर कोण काय करणार आहे आपलें! तारणाऱ्यापुढें मारणाऱ्याचें काय चालणार आहे? तारणाऱ्यावर मात्र आपण निस्सीम श्रद्धा ठेविली पाहिजे!"

बाबांचें हें बोलणं मिरीकरानीं व त्यांच्याबरोबर असलेल्यांनीं ऐकिलें. परंतु निदान त्यावेळीं तरी त्या बोलण्याचा स्पष्ट अर्थ त्यांना कळला नाहीं एवढें खरें.

अर्थ समजला नाहीं तरी मिरीकर गोंधळल्यासारखे झाले. परंतु त्या बोलण्याचा स्पष्टार्थ विचारण्याची कांहीं त्यांना छाती झाली नाहीं. बाबांच्या चरणावर भक्तिभावपूर्वक मस्तक ठेऊन ते त्यांचा निरोप घेऊन शिर्डी येथून तेरा मैलांवर असलेल्या चिथळी गांवीं जाण्यासाठीं टांग्यातून निघाले.

बाबांच्यानें रहावेना. भक्तावरील संकट त्यांना दिसत होतें. ते आपला परम भक्त शामा यास हांक मारून म्हणाले, "अरे शामा! तूंही जा ना 'ट्रीप' होईल, मजेत जा आणि मजेत ये."


शामा जायला तयार झाला. परंतु मिरीकर त्याला म्हणाले कशाला उगाच त्रास घेतोस इतक्या लांब येण्याचा? परंतु नंतर त्यांना समजलें कीं, शामानें मला सोबत करावी अशी बाबांची इच्छा आहे. त्यांच्या इच्छेआड कोण जाणार? ठरलें शामानें बरोबर जावें असें आणि दोघेहि टांग्यांत बसून चिथळीस जाण्यास निघाले व त्या गांवीं पोहोंचले. तेथें कोणी अधिकारी व्यवस्थेसाठीं यायचे ते कांहीं आले नाहीं. रात्रीची वेळ. मग मुक्काम ठोकला मारुतीच्या मंदिरात. सतरंजी आंथरली. कंदिल पेटविला व दोघेहि गप्पागोष्टी करीत बसले. तेथें एक वृत्तपत्र मिळालें तें वचीत मिरीकर हे पहुडले असतां एक नागोबा हळूंच येऊन वेटोळें करून मिरीकरांचें उपरण तेथेंच बाजूला होते त्यावर आरूढ झाला! त्यांच्याबरोबर एक पट्टेवाला होता. त्याचें लक्ष चोहोंकडे असायचें परंतु त्या काळवेळीं त्यांचेंहि लक्ष त्या नागराजाकडे गेलें नाहीं. थोड्या वेळानें सुरसुर आवाज आला म्हणून पट्टेवाल्यानें चौफेर नजर फेकली तेव्हां कुठें ते डौलात बसलेले नागराज त्याच्या दृष्टीस पडले! त्याला पहातांच हलक्या आवाजात साप! साप! म्हणत तो थोडा पुढें सरकला. मिरीकरांच्या लक्षांत परिस्थिति चटकन् आली. घाबरले! तेथें असलेली सारी माणसें तात्काळ हातीं सापडेल तें घेऊन पुढें सरसावली. नागराजानें आपल्यावरील संकट ओळखलें. तो हळुहळु तेथून मागें सरकूं लागला. परंतु त्या भयंकर प्राण्याला तसाच कोण जाऊं देणार? त्याच्यावर काठ्यांचा घाव पडून त्याचे तुकडे तुकडे झाले.!

केवढें मोठें संकट ओढवलें होतें हें! बाबांनीं तें अगोदरच ओळखलें व तत्संबंधीं जाणीव करून दिली एवढेंच नव्हे तर भक्त शामाला बरोबर पाठविला! साई माऊली किती दयाळू कृपाळू व भक्ताबद्दल कनवाळू आहे याची मिरीकरांनीं त्याचवेळीं खूणगांठ बांधिली. बाबांचे मन भक्ताबद्दल किती कनवाळू!

**दर्शनाचें महात्में दाविलें। मशिदीचें महत्त्व ठसविलें। निजप्रेम निदर्शना आणिलें। सहज लीलेकरून॥**

संत आपल्या श्रद्धावंत भक्तासाठीं असे जपत असतात. सदासर्वकाळ त्यांचा पाठीराखेपणा करीत असतात.

—संपादक



# रामनामाचें महात्म्य

लेखकः—आप्पाराव

**श्री बोधेंद्र सरस्वती हे कांची पिठाचे ५९ वे शंकराचार्य. त्यांचा जन्म कांची येथे झाला. वडिलांचें नांव पांडुरंग योगी व आईचें नांव सगुणांबल. नामसंकीर्तन व त्याद्वारे मोक्ष प्राप्ती याचा प्रचार त्यांनीं परोपरीनें केला. नाम महात्म्याबरोबर समजावे व त्याचा आधार घेऊन जनतेनें स्वतःचा उद्धार करून घ्यावा यासाठीं त्यांनीं अनेक ग्रंथांची रचना केली. दक्षिण भागांतील ते नामदेवच होत.**

तो मध्यरात्रींचा समय होता. जगन्नाथ क्षेत्रीं कवी लक्ष्मीधर हे रहात असत. त्यांच्या घराच्या बाहेरच्या पडवींत बोधेंद्र सरस्वती हे त्या मध्यरात्रींच्या सुमारास या कुशीवरून त्या कुशीवर घडपडत होते. ते यात्रेच्या निमित्तानें बाहेर पडलेले, जगन्नाथ क्षेत्रांत आले तेव्हां अपरात्र झालेली. अशावेळीं दरवाजा ठोठावून घरांतील माणसास त्रास देण्यापेक्षां उजाडेपर्यंत उरलेली रात्र बाहेर काढणें बरें असा त्यांनीं विचार केला.

**एका ब्राम्हण वरील प्रसंग**

स्वामीजी काशीक्षेत्र करून कांचीस जात होते. वाटेंत जगन्नाथ क्षेत्र लागलें. मग जातां जातां लक्ष्मीश्वर कवीची भेट घेऊन जावें असा त्यानीं विचार केला.

स्वामीजी बाहेर लोळत पडले असता जें करण्याचें त्यांनीं टाळलें होतें तेंच घडत असल्याचें त्यांना पहावें लागलें. कोणी एक ब्राह्मण जोरजोराने दरवाजा ठोठावीत होता ! ज्या आवेशानें तो दरवाजा ठोठावीत होता त्यावरून तसेंच कांहीं महत्त्वाचें कारण घडलें असावें असा कोणीही कयास केला असतां ब्राम्हणाचा चेहराच घाबरलेला दिसत होता.

कांहीं मिनिटं ठोठावणें चालल्यानंतर त्या घराचा दरवाजा कोणी तरी खाडकन् उघडला. बाहेर डोळे चोळीत चोळीत आले ते लक्ष्मीश्वर कवीचे चिरंजीव लक्ष्मीकांत होते.

"मी त्रास देत आहे आपल्याला ! माफ करा." तो ब्राह्मण म्हणाला.

"कांहीं हरकत नाहीं. तुम्हीं घरांत तर या !"

तें शांत उत्तर ऐकून त्यांच्या मागोमाग तो ब्राम्हण घरांत प्रवेश करता झाला. एका चटईवर बसून ते बोलू लागले.

**ब्राम्हणाची दुर्दैवी कहाणी**

ब्राम्हण म्हणाला, "माझ्या मनांत एक शंका निर्माण झाली आहे ती मला तावडतोब दूर करून घ्यायची होती.त्यामुळें अशा अवेळीं येथें येऊन मला आपणास त्रास द्यावा लागला. मी सुमारें पांच वर्षांपूर्वी पत्नीसह काशी यात्रेसाठीं बाहेर पडलों.प्रवास करीत मी येथवर आलों. येथून जवळच असलेल्या गावीं माझा मुक्काम एका खानावळींत होता. रात्रींच्या वेळी आम्ही बाहेर झोपलो होतों. पहांटेच्या प्रहरी मी उठून पहातों तर माझी बायको जवळ नव्हती. तिच्या शोधासाठीं मी तसाच बाहेर पडलों. सतत तीन दिवस तिच्या शोधांत घालविले व शेवटीं कंटाळून तो नाद सोडून दिला. मी काशीला निघून गेलो. नंतर परत येत असतां कोणी एक स्त्री तेथें पाणी भरण्यासाठीं आलेली मी पाहिली. मी तिच्याकडे पाहिलें नाहीं. परंतु ती माझ्याकडे पाहून ओक्साबोक्शी रडूं लागली. मी तिच्याकडे पाहिलें तेव्हां तिची ती अवस्था पाहून ही कोणी तरी बाई आहे हे मी सहज समजू शकलो. ती बाई भयंकर भुतासारखी दिसत होती.

"बाई तूं आहेस तरी कोण ? आणि अशी रडतेस कां ?" मी प्रश्न केला.

**मला ओळखलें नाहीं ?**

"मला ओळखलें नाहीं आपण ! मी आपली पत्नी ना ? काशीयात्रेसाठीं आपण उभयता निघालों होतों. याच गावांतील त्या एका खानावळींत आपण मुक्काम केला. त्यादिवशीं रात्रीं आपण झोपी गेले असतां दुष्ट दरोडखोरांनीं माझ्यावर हल्ला करून मला पळवून नेलें आणि माझी ही अशी दशा करून टाकिलीं.त्या दिवसापासून मी नर्कवास भोगीत आहें ! काय सांगूं आपल्याला ! माझ्या दैवांचा हा खेळ ! कोणत्या तोंडानें मी माझी दुःखद कहाणी आपणास सांगूं ? मी आपली पत्नी म्हणून घेण्यास आतां लायक नाहीं. मी समजू शकतें ! माझें नशीब म्हणून निदान आपली मला येथें भेट तरी झाली. आतां यापुढें आपली पत्नी म्हणून नव्हे तर घरांतील मोलकरीण म्हणून तरी मला आपण आश्रय द्यावा. मरेपर्यंत आपली इमानें इतबारें सेवा करीन; परंतु माझा त्याग करूं नका व सध्यांतरी या संकटांतून माझी सुटका करा एवढेंच मागणे आहे माझें. चला ! ते दुष्ट येथें परत तपास करीत येतील व आपणाला संकटांत लोटतील. तरी त्वरा करा व येथून आपण कुठें तरी जाऊं या !"

**अंतःकरण द्रवलें !**

तिचा तो कबुली जबाब, तिची ती असहाय्यता व केंवीलवाणी स्थिती पाहून

माझें अंतःकरण द्रवलें. मी तिला म्हणालो "तुला दरोडेखोरांनीं जबरदस्तीनें नेलें याची मला कांहींच कल्पना नव्हती. सतत तीन दिवस अर्धमेल्यासारख्या स्थितींत मी तुझा तपास केला. शेवटीं निराशेनें तो मार्ग सोडून दिला. सुदैवानें आपली पुन-र्भेट होण्याचा योग जुळून आला ठीक आहे. तूं म्हणतेस त्याप्रमाणें तूं माझ्या-जवळ राहूं शकतेस. पाहूं या देवाच्या मनांत काय आहे तें!".

याप्रमाणें तिला आश्वासन देऊन मी तिच्यासह जंगल भागांतून प्रवास करीत करीत येथपर्यंत येऊन पोहोंचलों. तिचा कांहीं अपराध नसता तिला पापकर्दमांत खेचलें गेलें. त्या पापाचरणावर कांहीं उपाय आहे का? येथून जवळच असलेल्या वृक्षाखालीं ती उभी आहे. कांहीं उपाय असल्यास कृपा करून सांगा महाराज!"

**उपाय आहे!**

लक्ष्मीकांतनें त्या ब्राह्मणाची हकिगत शांतपणें व लक्षपूर्वक ऐकिली. दोन मिनिटें विचार करून ते म्हणाले, "होय, उपाय आहे. त्या पतित बाईला तीन वेळां 'रामनाम' घ्यायला सांगा म्हणजे सर्व पापांतून तिची मुक्तता होईल. आणि मग, तुम्हीं तिला आपल्या जवळ बाळगायला कोणतीच हरकत नाहीं!"

लक्ष्मीकांत अशारीतीनें त्या ब्राम्हणाचें मार्गदर्शन करीत असतां त्यांची मातोश्री घरांतच होती. तो संवाद तिनें ऐकिला व एकदम म्हणाली, 'रामनाम एकदा घेतलें तरी त्यामुळें पापक्षालन होऊं शकतें. तीन वेळ घेण्याची जरूरी नाही. तुझ्या वडिलांकडून मी हें ऐकलें आहे. मग त्या बाईला तीन वेळां रामनाम घेण्याची जरुरीच कुठें राहिली?'

बाहेरच्या बाजूस बोधेंद्र सरस्वतीस्वामी आंत चाललेला हा संवाद ऐकत होते. ते आंत आले तोंच लक्ष्मीकांत आदरानें उभे राहिले व त्यांनीं त्यास नमस्कार केला.

**मला आधार दाखवा!**

बोधेंद्र स्वामीजी त्यांना उद्देशून म्हणाले, "तुमचें बोलणें बाहेर बसून मी ऐकत होतो. माफ करा. या ब्राह्मणाला पापक्षालनाचा मार्ग तुम्ही दाखवून दिला; परंतु त्याला आधार कोणता तो मला दाखवून द्याल का?"

"होय! आधार आत्तांच मी आपणांस दाखवूं शकतों" असें सांगून लक्ष्मी-कांत दुसऱ्या एका खोलींत गेले व नामकौमुदी या त्यांच्या वडिलांनीं रचलेल्या काव्य ग्रंथाची एक प्रत घेऊन बाहेर आले व म्हणाले "हा पहा आधार!"

बोधेंद्र स्वामींनीं तो आधार लक्षपूर्वक वाचला व म्हणाले, "मला मान्य आहे हें वचन; परंतु त्याचा खरेखोटेपणा मला येथल्या येथें ताडून पहावयाचा आहे. मग मात्र माझी श्रद्धा त्या वाक्यावर पूर्णपणें बसेल. हें पहा! भगवंताच्या नामसंकीर्तनाचें जर एवढें महत्व आहे तर त्या बाईला जगन्नाथ तीर्थावर जाऊन स्नान करूं द्या. तिला रामनामाचा जयघोष करूं द्या. आणि ती जशी पूर्वी होती (नवऱ्याची व तिची ताटातूट होण्यापूर्वी, तशी पूर्ववत् होऊं द्या. तिच्या अंगावर काळे कपडे आहेत ते शुभ्र

होऊं द्या. व तिच्या भालप्रदेशीं कुकूंम तिलक ( सौभाग्य लक्षण ) नाहीं तो दिसूं द्या, मग रामनामाचें महत्त्व नामकौमुदीत म्हटल्याप्रमाणें खरें आहे असें मी समजेन."

## आव्हान स्वीकारलें

लक्ष्मीकांतनें तें आव्हान आनंदानें स्वीकारलें. दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्या स्त्रीसह सर्वजण जगन्नाथ तीर्थावर गेले. रामनामाचा गजर करीत त्या हतभागी बाईनें तीर्थांत बुडी मारली ती वर येतांच तिची सारी काया पालटलेली, अंगावर शुभ्र वस्त्रें व भालप्रदेशी कुंकुम तिलक अशा स्वरुपांत ती सर्वांना दिसूं लागली.

सर्वजण आश्चर्यानें थक्क झाले! रामनामाचा केवढा हा महिमा! सर्वांनीं तिच्या हातचें तीर्थ घेतलें. ती पावन झाली.

त्या जोड्याला आशीर्वाद देऊन बोधेंद्रस्वामी गुरुच्या आज्ञेप्रमाणें नंतर कांची येथें गेले. तेथें गेल्यानंतर विधीपूर्वक कांची पिठावर शंकराचार्य या नात्यानें त्यांची नंतर स्थापना झाली.

नामकौमुदी या ग्रंथाचा आधार घेऊन त्यानंतरच्या काळांत नाम महात्म्य सर्वांना समजावें व पटावें या हेतूनें त्यानीं पुढील आठ ग्रंथांची रचना केली. (१) नामामृत रसोदय, (२) नाम रसायन. (३) नाम सुर्योदय, (४) नाम तरंग, (५) नामार्णव, (६) हरिहर भेदाधिकार, (७) हरिहर अद्वैतभूषण व (८) मूर्त ब्रम्ह विवेक.

सतराव्या शतकांतील ही घटना आहे. अजूनही शंकराचार्यांची त्या भागांत नामसंकीर्तनाचें आचार्य या नात्यानें घरोघर भक्तिभावपूर्वक पूजाअर्चा होत असते.

सर्व लोक शरण्याय बोधेंद्र गुरु मूर्तये। श्री धरार्यस्वरूपाय नामोद्धाराय मंगलम ॥ हा श्लोक सर्वांच्या तोंडी आजही आहे.

एवढें आहे रामनामाचें महत्व!



# कांहीं प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें

**********************

प्रश्न : धर्म किंवा धार्मिक जीवन कशासाठीं ?

उत्तर : आमची देवाकडे, सदाचाराकडे व जें जें सर्वोत्तम त्याकडे दृष्टी लागावीं यासाठीं धार्मिक जीवन जगण्याचें जरुरी.

प्र. : सर्वांत मोठा धर्म कोणता ?

उ. : सर्व धर्म सारखेच मोठे आहेत.

प्र. : हिंदु धर्मांचें वैशिष्ठ्य कोणतें ?

उ. : हिंदु धर्म हा सनातन धर्म आहे. या भारतांत हजारो वर्षांपासून तो नांदत आला आहे व योग्यप्रकारें मार्गदर्शन करीत आला आहे.

प्र. : या धर्मांची प्रमूख तत्वें कोणतीं ?

उ. : देवावर श्रद्धा ठेवणें, अहिंसा, अपहार न करणें, तपाचरण करणें, मनावर साधनेच्या द्वारा ताबा मिळविणें. हा सनातन धर्म सर्व धर्मांचा पितामह आहे. तो प्राचीन काळापासून अस्तित्वांत आहे आजही आहे व पुढेंही अक्षय रहाणार आहे.

प्र. : माणसानें काय मिळविण्यासाठीं झटावयाचें. ?

उ. : सदाचारानें वागण्यासाठीं झटावयाचें. त्याच्या आड ज्या ज्या गोष्टी येतील त्या टाळावयाच्या. त्यांच्याशीं सामना द्यावयाचा.

प्र. : खरा आंधळा कोण ?

उ. : सुशिक्षित असूनही जो करूं नयेत त्या गोष्टीं करतो. तो डोळे असून आंधळा समजावयाचा.

प्र. : कान असून बहिरा कोण ?

उ. : जो देवाचें नामस्मरण ऐकण्याची संधी आली असतां ऐकण्याची टाळाटाळ करतो तो;

प्र. : खरा मुका कोण ?

उ. : जो देवाचें नांव घेत नाहीं व जो योग्यवेळीं मधूर न बोलतां कडवट बोलतो तो !

प्र. : हें जीवन सदुपयोगी कसें होईल?

उ. : इतरांच्या सुखासाठीं व दुसऱ्यांचें दुःख निवारण करण्यासाठीं झटल्याने.

प्र. : या जगांत माणसाचा सर्वांत मोठा व मारक शत्रू कोण ?

उ.: आळस !

प्र.: खरा वीर पुरुष कोण ?

उ.: जो कोणत्याही मोहांत सांपडत नाहीं तो.

प्र.: सर्वांत वंदनीय जीवन कोणतें ?

उ.: कोणत्याही प्रकारचा कलंक ( डाग ) न लागलेलें.

प्र.: आमच्या सर्वनाशास कारण होणारा आमचा शत्रू कोण ?

उ.: अहंकार !

प्र.: नर्कवास कोणता ?

उ.: दुसऱ्यांवर अवलंबून रहावें लागणें हा !

प्र.: मरणापेक्षांही मारक अशी कोणती गोष्ट ?

उ.: अज्ञांन !

प्र.: सर्वांत शहाणा कोण ?

उ.: जो लोभ न बाळगतां आपल्याजवळ असेल नसेल तें देण्यास तयार तो.

प्र.: अत्यंत मौल्यवान् अशी गोष्ट कोणती ?

उ.: एखाद्यास योग्यवेळीं जरुर ती मदत करणें.

प्र.: मरण येईपर्यंत माणसाला तापदायक होऊन रहाणारी गोष्ट कोणती ?

उ.: हातून घडलेला गुप्त गुन्हा.

प्र.: आपला खरा मित्र कोण ?

उ.: दुष्कृत्य हातून घडूं नये याबद्दल दक्षता बाळगणारा.

प्र.: तुमचा सर्वांत मोठा शत्रू कोण ?

उ.: तृष्णा !

प्र.: साऱ्या जगाची माता कोण ?

उ.: गायत्री

प्र.: वीष कुठें असतें ?

उ.: दुष्ट माणसांच्या ठायीं.

प्र.: भीतीदायक असें या जगांत काय आहे ?

उ.: संपदा !

प्र.: ईश्वर सर्वांत जास्त प्रेम कोणावर करतो ?

उ.: जो स्वतःच्या बाबतींत व इतरांच्या बाबतींत वाईट कधींही चिंतीत नाहीं त्यावर.

प्र.: या जगांत भरभराट कोणाची होते ?

उ.: जो योग्य रीतीनें वागतो त्याची.

प्र.: गमावून कोण बसतो ?

# म्हणून सावधान !

—श्री रामकृष्ण परमहंस

देव कल्पवृक्षाप्रमाणें आहे. तुम्हीं जें जें मागाल किंवा ज्याची इच्छा कराल ती पुरविणारा आहे. धर्मसाधनेनें आपलें मन पूर्ण पवित्र झाल्यानंतर तरी तुम्हीं या जगांतील इच्छा, आकांक्षावर पाणी सोडण्यास तयार असलें पाहिजे. नंतर कशाचीही इच्छा तुमच्या अंतःकरण्यांत जागृत होतां कामा नये.

**एका प्रवाशाची गोष्ट**

एक दृष्टांत देऊन याची सुस्पष्टता करणें इष्ट वाटतें.

कोणी एक प्रवासी प्रवास करतां करतां एका निर्जन पठारावर येऊन ठेपला. तो किती तरी तास उन्हातान्हांतून चालत होता. त्यामुळें तो फार थकला भागला होता. त्याच्या सर्वांगांतून घाम वहात होता. पुढें पाऊल टाकवत नव्हतें. कुठें तरी स्वस्थ पडावें असें त्याला वाटत होतें. जवळपास एक वृक्ष आढळून येतांच त्याच्या थंडगार छायेखालीं जाऊन तो विश्रांतीसाठीं बसला.

थकल्यामुळें त्याचे डोळे आपोआप मिटले. मनांत नाना प्रकारचे विचारतरंग जागे झाले. " अहाहा ! किती गार वाटत आहे ! येथें हातपाय पसरून स्वस्थ पडावें असें वाटतें. यावेळीं एखादा मऊ मऊ बिछाना जर का मिळाला असता तर काय मजा आली असती !

**कल्पवृक्षाखालीं आसन**

तो प्रवासी ज्या वृक्षाखालीं बसला होता तो कल्पवृक्ष होता. त्याला त्याची

---

उ. : लोभी माणूस !

प्र. : अविश्वनीय कोण ?

उ. : असत्य बोलणारा

प्र. : सुसंपन्न कोण ?

उ. : ज्याला सदाचारी, सुजाण मुलें आहेत तो.

प्र. : सर्वांत कठीण कार्य कोणते ?

उ. : मनावर ताबा ठेवण.

प्र. : दुःख कोणाच्या वाट्याला जात नाहीं ?

उ. ज्यानें रागावर, वाढत्या लोभावर जय मिळविला त्याच्या.

कल्पना कशी असणार! मग झालें काय? हां हां म्हणतां त्याच्या पुढ्यांत एक मऊ बिछाना पसरला गेला!

केवढी आश्चर्याची घटना! तो प्रवासी आश्चर्यांनें थक्क झाला. त्यानें तात्काळ आपले हातपाय त्या मऊ बिछान्यावर पसरले.

कल्पनेची कमान उंच भराऱ्या मारूं लागली! आणि मग त्याच्या मनांत आलें कीं, वाहवा! या निर्जन प्रदेशांत माझी एवढी सोय झाली मग माझे थकलेले पाय चेपायला एखादी सुंदर तरुणी येथें आली असती तर दुधांत साखर पडल्यासारखें झालें नसतें का?

काय आश्चर्य! त्याच्या मनांत तो मधुर विचार यायला आणि एक सुंदर तरुणी तेथें अकस्मात अवतीर्ण होऊन त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचे पाय चेपायला एकच गांठ पडली! किती मजेदार घटना घडून आली होती!

त्या प्रवाशाच्या पोटांत कावळे काव काव करूं लागले होते. तो तहानभूक या अनपेक्षित घटनांमुळें विसरून गेला होता. आतां त्याला भुकेची आठवण झाली.

### भुकेचें निवारण

तो स्वतःशींच म्हणाला " मी जें जें इच्छिलें तें तें मला मनांत येतांच मिळालें. आतां भुकेनें मी व्याकूळ झालों आहें मला कांहीं तरी चांगलें भुकेचे निवारण करणारें यावेळीं मिळातें असलें तर किती छान झालें असतें.

आणि काय आश्चर्य. त्याच्या समोर स्वादिष्ट पदार्थांनीं भरलेलें ताट हां हां म्हणतां आलें!

खा! किती लागेल तेवढें खा! अगदीं पोट फुटेपर्यंत खा!

आणि त्यानें केलें तसेंच! यापूर्वी जन्मांत त्यानें असले स्वादिष्ट पदार्थ पूर्वी कधीं पाहिले नव्हते! वा चाखलेही नव्हते!

थंडगार पाणी पिऊन त्यानें भला ढेकर दिला. डोळ्यावर गुंगीचा अंमल चढू लागला होता. तो पुनरपि बिछान्यावर लवंडला आणि घडलेल्या एकंदर घटना संबंधी मनांतल्या मनांत विचार करूं लागला. सुखाची परमावधि झालेली होती.

### वाघोबा आला

हें जीवन किती विचित्र आहे पहा! मानवी मनाची धांव कुठवर जाईल, सांगतां येत नाहीं. आत्यंतिक सुखसमाधानाच्यावेळींही दुर्दैवानें मनांत येऊं नयेत ते विचार येऊं लागतात!

तो विचार करूं लागला. किती सुखांत व आनंदांत आहे मी! अशावेळीं एखादा वाघ येथें येऊन त्यानें जर माझ्यावर झडप घातली तर या साऱ्या सुखाचा भंग होईल नाहीं का!

आणि केवढी आश्चर्याची गोष्ट ! एक वाघोबा हां हां म्हणतां डरकाळ्या फोडीत तेथें आला. त्या प्रवाशावर त्यानें झडप घातली व त्याचे फाडून फाडून त्यानें तुकडे करून टाकले !

**दैवाची विचित्र लीला**

संपला त्याचा अवतार ! माणसाचें दैव कसें असतें पहा ! कधीं कोणाच्या वाट्याला कोणती स्थिति येईल हें सांगतां येणें कठीण आहे !

तुम्हीं देवाची प्रार्थना करतां, त्यांचें नामसंकीर्तन करतां. अगदी मनापासून करतां. देव तुम्हांला, तुमचा भक्तिभाव पाहून पावतो. तुमच्या इच्छा तो पूर्णही करतो. परंतु त्यामुळें तुम्ही हुरळून जायचे नाहीं. नामसंकीर्तन सोडायचे नाहीं. त्याची कास घट्ट धरायची. त्यामुळें मनाची शुद्धी साध्य होते. मनांत भलते सलते विचार थैमान घालीत नाहींत. मनाचें पावित्र्य संभाळणें, स्वार्थलोलुप न होणें हें फार महत्वाचें आहे.

देवानें तुमची इच्छा पूर्ण केली हे खरें; परंतु त्या पूर्ततेमागे वाघोबा दबा धरून बसलेला असतो. तुम्ही गैरसावध राहिला, स्वच्छंदानें वागूं लागला तर तो कधीं तुमच्यावर झडप घालील व तुमचा चेंदामेंदा करून टाकील हें सांगतां येणार नाहीं. म्हणून सावधान !

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# शिक्षण, शाश्वत सुख व समाधान

लेखक : **घनंजय**

**आपण शिक्षण संपादन करण्यासाठीं धडपडत असतों. आपणाला ज्ञान प्राप्त करून घ्यायचें असतें. शिक्षण घ्यायचें तें कशासाठीं? नोकरी धंद्यासाठीं! आपली सर्वसाधारण हीच कल्पना; परंतु ती खोटी आहे.**

परंतु शिक्षणाचा अर्थ काय? तें खरोखर संपादन करायचें कशासाठीं? खरें शिक्षण कशाला म्हणायचें? याचा खोल विचार आपण कधीं केला आहे का? शिक्षणाचें अंतिम ध्येय कोणते!

**विद्या ददाति विनयं—**

एका संस्कृत श्लोकांत त्याचें विशदीकरण फार सुंदर रीतीनें करण्यांत आलें आहे.

विद्या ददाति विनयं विनयाद्याति पात्रताम्।
पात्रत्वाद् घनमाप्नोति घनाद् धर्मं ततः सुखम्॥

विद्येमुळें मनुष्य विनयसंपन्न बनला पाहिजे. विनयामुळें आमच्यांत थोरपणा, योग्यता निर्माण होते. थोरपणाबरोबर घनसंपदा प्राप्त होते, घनसंपदेमागोमाग धर्म व सुखसमाधान यांचा लाभ होतो.

शिक्षणामुळें आमच्यांत प्रथमतः जर कोणती क्रांति घडून यायची असेल तर ती म्हणजे आमच्यांत नम्रता निर्माण झाली पाहिजे. आमच्यांत आत्मनिरीक्षण बुद्धि व स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्याची पात्रता आली पाहिजे. ज्या शिक्षणापायीं या गुणांचा लाभ घडत नाहीं तें शिक्षण कुचकामी आहे असें खुशाल समजावें!

**खरें शिक्षण कोणतें?**

मग खरें शिक्षण कोणतें? उपरोक्त गुणांचा आपल्याठायीं परिपोष करणारें तेंच खरें शिक्षण होय. ज्ञानदान करणारी आदर्श संस्था कोणती समजावयाची? नम्रता शालीनता व शिस्त ज्यामुळें निर्माण होतें व अशा प्रकारचें शिक्षण जेथें दिलें जातें तीच ज्ञानदान करणारी आदर्श संस्था होय.

शिक्षणाचे पुष्कळ प्रकार आहेत. वेगवेगळया विषयांचें ज्ञान करून देणाऱ्या संस्था आहेत. हजर जबाबीपणा वक्तृत्व विनोद हे गुण तुमच्याठायीं यावें यासाठीं तुम्ही शिक्षण संपादन कराल. परंतु वर जो श्लोक उधृत करण्यांत आला आहे. तें शिक्षणाचें ध्येय तुम्हीं गाठू शकता काय? आणि जर तसें नाहीं तर तुम्हांला सुख व समाधान कोठून मिळणार?

## सुख सर्वांना पाहिजे

या जगांत प्रत्येकाला सुख हवें असते. दुःखाची इच्छा कोणी करीत नाहीं. सुख नेहमी मिळावें हीच प्रत्येकाची आकांक्षा. रोजगार धंद्यासाठीं, पोट भरण्यासाठीं जें शिक्षण घ्यायचें तें जरूर घ्यावें परंतु त्याचबरोबर जेणेंकरून या जगांत आपणास शाश्वत सुखाचा लाभ होईल अशा शिक्षणाचीही कास आपण अवश्य धरली पाहिजे. अशा प्रकारचें शिक्षण संपादन करणें ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाहीं. त्यासाठीं प्रयत्नशील राहावें लागतें; गुरुशिवाय शाश्वत सुखाला कारणीभूत होणारें ज्ञान मिळणार नाहीं. तशा गुरुचा शोध आपण लावला पाहिजे. त्याचें सान्निध्य संपादन केलें पाहिजे.त्याचे पाय धरले पाहिजेत. गुरुपदेश शिरसावंद्य मानून त्याचप्रमाणें आपण वागलें पाहिजे. तसें वागणें हें आम्ही आमचें पवित्र कर्तव्य मानिलें पाहिजे.

## आईवडिलांचें कर्तव्य

ज्ञान संपादनाच्या व कर्तव्य पालनाच्या दृष्टीनें पाहतां माता व पिता यानींही मुलांबाळांसंबंधीं आपल्या कर्तव्यपालनांत कसूर करतां कामा नये. त्यानीं जन्म दिला एवढ्यावर त्यांचें कर्तव्य संपत नाहीं. त्यांची जबाबदारी फार मोठी तशीच ती महत्वाचीही आहे. आईवडील यानीं मुलांचें संरक्षण करायचे व त्याचें योग्य प्रकारें मार्गदर्शन करावयाचें हीं दोन पवित्र कर्तव्यें त्यांचीं आहेत.

जे आईवडील आपलें हें कर्तव्य मनापासून व योग्यप्रकारें पार पाडतील त्यांचीं मुलें सद्गुणी निपजलीं पाहिजेत. यावरून आईवडील यांच्या शिरावर केवढी मोठी जबाबदारी आहे याची सहज कल्पना करता येईल.

## पैसे मिळविणें हेंच ध्येय नाहीं

पैसे मिळविणें किंवा आपल्या संसाराचा गाडा हांकणें म्हणजे झाली आपली इतिकर्तव्यता हा समज चुकीचा आहे. ! मुलें मोठीं हातांत पैसे मिळवूं लागतात व आई वडिलांचें ऐकेनासें होतात. असें अनेकांच्या बाबतींत घडत असतें. आईवडील हताश होऊन स्वस्थ रहतात ! याचा दोष आईवडीलांकडे मुख्यतः असतो. लहानपणापासून त्यानीं आपल्या मुलांच्या बाबतींत निष्काळजीपणाचें, दुर्लक्ष करण्याचें धोरण स्वीकारलेलें असतें. त्याचा हा परिणाम घडून आलेला असतो ! यासाठीं आईवडीलांनी आपल्या मुलाबाळांच्या बाबतींत सदासर्वकाळ जागरुकतेनें वागलें पाहिजे. तें त्यांच्या त्याचप्रमाणें त्यांच्या मुलाबाळांच्या कल्याणाचें असतें.

आपण पैसा मिळविला पाहिजे व आपल्या गाठीला पैसा जरूर असला पाहिजे. आजच्या जगांत पैशाशिवाय पान हालत नाहीं. पैसा जवळ नाहीं तर कांहीं नाहीं. जीवनांत पैशाचें स्थान फार मोठे आहे. मग त्याच्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ? परंतु केवळ पैशाची पुंजी जवळ असल्यानें तुम्हीं सुखी व समाधानी

व्हाल असें मात्र नाहीं. पैशाचा उपयोग कसा करावा, तो स्वतःसाठीं व इतरेजनांसाठीं कसा उपयोगांत आणावा हें आपणास बरोबर समजलें पाहिजे. पैसा योग्य वेळीं, योग्य कारणासाठीं खर्च करण्याची बुद्धी आपणांस झाली पाहिजे.

**धर्म समजून घेतला पाहिजे.**


आम्हीं आमचा धर्म कोणता, आम्ही सुखी होऊं व इतरांस सुखी करण्यास समर्थ होऊं याचें सम्यक ज्ञान आम्हीं करून घेतलें पाहिजे.

या जगाचें नियंत्रण करणारा कोणी तरी नियंता आहे. त्याच्यामुळें हें जग व या जगाचा सारा कारभार चाललेला आहे. आपण त्याच्यावर निस्सीम श्रद्धा ठेविली पाहिजे. त्याला शरण गेलें पाहिजे म्हणजे मग आपला धर्म कोणता याची तुम्हांला जाणीव होईल व त्या धर्माची कांस धरल्यानें तुम्हीं सुखी व्हाल.

———


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितों. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स**
८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# निंदा आणि स्तुति

## महात्माजींचें एक महत्त्वाचें पत्र

१९३६ सालची ही घटना आहे. महाराष्ट्रांतील कांहीं वृत्तपत्रांतून व कांहीं विक्षिप्त व्यक्तीकडून महात्माजींसंबंधीं टीकापर लेख व प्रलाप ऐकूं येऊं लागले तेव्हां महाराष्ट्रांतील कांहीं विचारवंतांना व सुविचारी लोकांना पराकाष्ठेचें दुःख झालें. श्रीमती सौ. अवंतिबाई गोखले ह्या त्यांपैकीं एक होत्या.

त्या काळांत महात्माजींना पत्र लिहिल्याशिवाय त्यांच्यानें रहावेना. त्यांनीं लिहिलें कीं, "महाराष्ट्रांतील कांहीं वृत्तपत्रांतून तुमच्याविरूद्ध जो विषारी व खोटानाटा प्रचार चालू आहे तो आम्हांला असह्य होऊं लागला आहे. आणि आपण मात्र सर्वस्वीं मौनव्रत स्वीकारून स्वस्थ राहिलेले अहांत! त्याविरूद्ध कांहीं बोलतही नाहीं. आतां आमच्यासारख्यांनीं अशा परिस्थितींत करायचें तरी काय!"

महात्माजींनीं उत्तरीं लिहिलें होते कीं, "तुमचें पत्र मिळालें. सोबत वस्त्राची भेट पाठविली तीही मिळाली. महाराष्ट्रांतील माझ्या कांहीं मित्रांच्याद्वारें माझ्यासंबंधीं जो कांहीं विरूद्ध प्रचार चालू आहे त्याबाबतींत मी मुळींच अज्ञानांत नाहीं. मला त्याची पूर्ण जाणीव आहे; परंतु त्याबाबतींत मी काय करूं? महाराष्ट्रांतील माझे कांहीं मित्र ज्याप्रमाणें माझी जास्तींत जास्त निंदा नालस्ती करण्यांत गुंतले आहेत, त्याचप्रमाणें या देशाच्या निरनिराळ्या भागांतील किती तरी लोक माझी वारेमाप व आत्यंतिक स्वरुपांत स्तुति व प्रशंसा करण्यांत गुंतले आहेत. निंदा करणाऱ्याबद्दल मी माझें डोके तापवून घेण्याची जशी जरुरी नाहीं त्याच प्रमाणे प्रशंसा व स्तुति करण्यांबद्दल मी बेहोष होऊन जाण्याचीही जरुरी नाहीं! आहे काय त्यांत? निंदा करणाऱ्यानीं कितीही निंदा केली किंवा स्तुति करणाऱ्यानीं कितीही प्रशंसा केली तरी ईश्वरानें मला जसा घडविला आहे तसाच मी रहाणार, त्यांत बदल कांहीं होणार नाहीं, माझ्यांत त्यामुळें वध, घट कसली होणार आहे का? कांहीं नाहीं. मी एक कणभर वाढणार नाहीं, किंवा एक कणभर कमीही होणार नाहीं; ज्या भगवंतानें मला मनुष्य जन्म दिला त्याच्याबद्दल कृतज्ञ राहून आपल्या हातून होईल तेवढी प्राणीमात्राची सेवा करीत राहणे हाच माझा धर्म. यथाशक्ति त्याचें पालन करीत रहाण्यांतच मी समाधान मानावयाचें आहे

---

# सर्वांना समतेचा संदेश देणारे श्रीसिद्धारूढ स्वामी

लेखकः—पु. बा. कुळकर्णी

**“ आम्हां सर्व जनांच्या उद्धारार्थ । आणि प्रपंची अविवेकारि अनर्थ ॥ चुकवोनी प्राप्त करून द्यावा परमार्थ । ह्या हेतु धरूनि अवतरले ॥ ”**

आणि सर्व संतांचा अवतार याच महान् कार्यासाठीं असतो. श्रीसिद्धारूढ यांचेंही अवतार कार्य त्याहून वेगळें कसें असेल ? प्रत्येक स्त्री पुरुषानें सभोंवार पसलेल्या अंधकारांतून वाट काढीत काढीत दिव्य प्रकाशाकडे कशा रीतीनें जावें व स्वतःचें आणि इतरेजनांचें कल्याण कसें साधावें याचीच बहुमोल शिकवण त्यांच्या सन्निध जे जे आले त्यांना स्वामींनीं दिली. त्यांच्या मागें आजही त्यांचा शिष्य परिवार तेंच बहुमोल कार्य झटून पार पाडीत आहे.

“ मुत्या ! तूं असा रडत कां बसला आहेस ? तुला कसलं दुःख झालंय ? ”

“ महाराज ! माझें सर्व कांहीं ठीक आहे; परंतु दुःख एकाच गोष्टीचें होतंय. सर्व माणसें आपल्याजवळ येतात; आणि आपलें दर्शन घेतात. कोणी कोणी आपणास आपल्या घरीं नेऊन पूजाअर्चा करतात व नैवेद्य अर्पण करतात. मी मात्र पापी ! महार कुळांत जन्म घेतल्यामुळें माझ्या वाट्यास तें भाग्य कुठलं यायला ? मनांत असूनही जवळून आपलं दर्शन मला घेतां येत नाहीं किंवा कोणत्याही प्रकारें आपली सेवाही करतां येत नाहीं; यामुळें दुःखी कष्टी होऊन माझ्या कर्माला दोष देत मी रडत आहे ! ”

मुत्या महाराचा तो प्रेमळ भक्तिभाव पाहून सिद्धारूढ स्वामींचें अंतःकरण द्रवलें ! महाराज म्हणाले, ‘ एवढेंच ना ? त्याची काळजी करूं नकोस तूं मुत्या ! तुझी इच्छा पूर्ण होईल; मग तर झालें ना ? उद्यां दुपारी बारा वाजतां मी तुझ्या घरीं नैवेद्यास येईन; मग तर झालं ना ? ”

## मुत्या महाराची शंका

महाराजांनीं याप्रमाणें आश्वासन दिलें असलें तरी त्यांची भक्तमंडळी त्यांना माझ्या घरीं कसें येऊं देतील ? मुत्याला शंका येऊन तो तटस्थतेनें त्यांच्याकडे पहातच राहिला.

" मुत्या, तुला शंका आली होय ? कांहीं काळजी करूं नकोस. मी बोललेलें कदापि खोटें ठरणार नाहीं. तूं घरीं जा आणि तयारीस लाग !"

सिद्धारूढ स्वामींचें हें निर्धाराचें वचन ऐकून मुत्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्यांना भक्तिभावानें वंदन करून हें आनंदाचें वृत्त आपल्या बायकोला सांगण्यासाठीं तो धांवतच घरीं गेला.

परंतु बायकोचा कांहीं केल्या मुत्याच्या सांगण्यावर विश्वास बसेना. आपल्या नवऱ्यास वेडबीड तर लागलें नाहीं, अशी ही शंका तिच्या मनांत येऊन गेली; परंतु बायकोला काय वाटलें याचा विचार करीत न बसतां मुत्या आपलें घर साफसूफ करण्याच्या उद्योगास लागला. महाराजांवर त्याची पूर्ण श्रद्धा होती. संतांचें वचन तें, तें का कधीं खोटें होणार ? आपल्या बायकोलाही परोपरीनें सांगून तिची त्यानें खात्री पटवून दिली.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून या प्रेमळ पती-पत्नींनी सडासंमार्जन करून आपलें घर साफसूफ केलें. रांगोळ्या घातल्या व पूजेची त्याचप्रमाणें नैवेद्याची यथासांग तयारी केली व बारा वाजतात केव्हां आणि महाराजांचे पाय आपल्या झोपडीस लागतात केव्हां याची तें जोडपें मोठ्या उत्कंठेनें वाट पहात बसलें. काय तो त्यांचा आनंद.

## महाराजांनीं वचन पाळलें

महाराजांचा नित्यक्रम ठरलेला असे. सकाळीं साडे अकरा वाजतां भोजन करून ते बारा वाजतां विश्रांतीसाठीं शयनगृहांत जात असत. आने रामप्पा व खंडे भिमाप्पा हे दोघे सेवेकरी त्यांच्याबरोबर नेहमीं असावयाचे. महाराज आंत गेले म्हणजे या दोघांनीं दरवाजावर पहारा करीत बसावयाचें. महाराज जागे झाल्याची चाहूल लागली म्हणजे आंत जाऊन त्यांच्या सेवेला हजर रहावयाचें.

अशा या कडेकोट बंदोबस्तांत महाराजांनीं ठरल्याप्रमाणें मुत्या महाराचें घर कसें गाठावयाचें ? परंतु सिद्ध पुरुषाला काय ? सिद्धीच्या बळावर अघटीत घटना पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें ! त्या सिद्धीच्या बळावर ठरल्याप्रमाणें ठरलेल्या वेळीं महाराज मुत्या महाराच्या घरीं गेले. मुत्याच्या व त्याच्या पत्नीच्या आनंदाला पारावार नव्हता. त्यांनीं महाराजांचे पाय धुऊन त्यांची भोळ्या भक्तिभावानें षोडशोपचारें पूजाअर्चा करून त्यांना नैवेद्य अर्पण केला व त्या प्रेमळ दंपतीच्या वर्तमान महाराजांनीं तो प्रेमानें ग्रहण केला.

भोजन संपल्यानंतर महाराज हात धुण्यासाठीं झोपडीबाहेर आले. त्याचवेळीं सिध्या या नांवाचा महाराजांचा एक भक्त भिक्षा मागून मठाकडे जात होता. त्यानें महाराजांस पाहिलें व त्याला आश्चर्याचा प्रचंड धक्का बसला. आपण हें

काय दृश्य पहात आहोंत! आपले सिद्धारूढ महाराज आणि ते मुत्या महाराच्या घरीं! आपल्या दृष्टीवरील त्याचा विश्वास उडाला! भलतेंच कांहीं तरी. असं घडणं कधीं शक्य आहे?

महाराज त्या दंपतीस आशीर्वाद देऊन स्वस्थानीं निघून गेले होते.

**भक्तमंडळींत खळबळ**

सिध्याच्यानें स्वस्थ रहावेना. खात्री करून घेण्यासाठीं तो मुत्याच्या घरी गेला व दूर उभा राहून मुत्याला हांक मारूं लागला. मुत्यानें खरें तेंच त्याला सांगितलें.

सिध्या क्रोधानें लालबुंद झालेला होता. तो तडक मठांत गेला व सर्व भक्तमंडळीस जमवून आपण पाहिलेली व ऐकलेली सारी आश्चर्यकारक हकीगत त्यांना निवेदन केली.

"या सिध्याचें डोकें तर फिरलं नाहीं! वेटा वाटेल तें बरळत सुटला आहे!" असें म्हणून भक्तमंडळीनीं त्याला वेड्यात काढलें. हातच्या कांकणास आरसा कशाला? आपण शयनमंदिरात जाऊन महाराज येथें आहेत कीं नाहींत व काय करताहेत तें तर पाहूं या. अशा विचारानें सिध्यासह सर्व मंडळी लगबगीनें शयनमंदिराकडे वळली.आणि तेथें पहातात तों काय? महाराज खुशाल विश्रांती घेत पहुडले होते. आंतबाहेर सर्वत्र सामसूम होतें!

बिचारा सिध्या शेवटीं खोटा ठरला!

दुसरा दिवस उजाडला. नित्याप्रमाणें मठाची सेवा करण्यासाठीं मुत्या मठाबाहेर दाखल झाला. कांहीं भक्तांना सिध्यानें सांगितलेली घटना पडताळून पहावयाची होती. त्यांच्या मनात एक प्रकारचें कुतुहल उत्पन्न झालें होतें. भक्त मंडळी मुत्यासभोंवार गोळा झाली व त्याला उलटसुलट प्रश्न विचारूं लागली. प्रश्नांच्या त्या सरबत्तीनें मुत्या महार गर्भगळीत झाला! त्याच्या तोंडावाटे शब्द बाहेर पडेना. तो दीनवाणा इकडे तिकडे पाहूं लागला. आतां आपली धडगत नाहीं असें त्याला वाटलें असावें.

**भक्तांच्या मनांत विचारक्रांति**

त्याची ती करुणाजनक अवस्था पाहून भक्तमंडळींनीं त्याला अभय दिलें. "मुत्या! तूं घाबरूं नकोस. महाराज तुझ्या घरी आले होते का? जे काय खरें असेल तें सांग. तुला आम्हीं मारणार नाही, तुला मारायला आम्हीं कां वेडे आहोंत?"

आतां मात्र मुत्याला धीर वाटूं लागला. मुत्यानें घडलेली सारी हकिगत अथपासून इतिपर्यंत सांगितली व हात जोडून क्षमेची याचना केली!

ती हकिगत ऐकून भक्तमंडळीच्या मनांत चक्क प्रकाश पडला. सर्व भूतमात्रांच्या ठायीं समभाव असावा, या महाराजाच्या शिकवणुकीची त्यांना जाणीव झाली. यांत मुत्याला दोष कां म्हणून द्यावयाचा? या घटनेच्या रूपानें महाराजांनीं भक्तजनांच्या

मनांत विचारक्रांति घडवून आणिली होती. आयुष्यांतील हा एक अमोलिक धडा होता. यापुढें भक्तांना तो अखंड गिरवायचा होता. मुऱ्याला सर्वांनी धन्यवाद दिले.

त्यानंतर मुऱ्या महाराला मठाचें द्वार कायमचें मोकळे झालें. तो मठांत मोकळेपणी वावरूं लागला !

संतांना जातगोत कांहीं नसतें. 'सर्वभूती समभाव' ही त्यांची भावना असते व त्यीं शिकवणुकीचा प्रसार ते जनतेंत आपल्या आचारणानें करीत असतात. सिद्धारूढाच्या शिष्यांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक होते. सर्वांच्या उद्धारासाठीं त्यांचा अवतार होता.

**सिद्धारूढांचें बालपण**

हैद्राबाद संस्थानमधील वंशदुर्गग्राम नांवाच्या गांवीं ईश्वरभक्तिपरायण सात्विक व आचरणानें अत्यंत पवित्र अशा कुळांत सिद्धारूढाचा जन्म १८३७ सालीं झाला. वीरभद्रस्वामी हे त्याच्या मातापित्याचे गुरु. या गुरुप्रसादानेंच त्यांचा जन्म झालेला होता. बाळपणापासून वीरभद्रस्वामींनीं त्याची योग्यता ओळखली होती. एकदां वीरभद्रस्वामी सांगत असलेले बसवेश्वर पुराण ऐकत असतां एका कठीण शब्दाचा त्यांनीं त्यांस अर्थ विचारला तेव्हां "तो अर्थ ब्रह्मवेत्त्या गुरुकडून समजून घे," असें त्यांनीं उत्तर दिलें.

यानंतर बालवयांतच सिद्धारूढांना गुरूचा ध्यास लागला. गुरुशिवाय गति नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें, मोठ्या कष्टानें आपल्या मातापित्यांचा निरोप घेऊन सिद्धारूढ गुरुच्या शोधार्थ बाहेर पडले.

गुरु का वाटेवर पडले आहेत ? गुरुभेट भाग्याशिवाय व योग्य ती वेळ आल्याशिवाय कशी घडणार ? ध्रुवबाळाच्या दृढ निश्चयानें सिद्धारूढ गुरुशोधार्थ बाहेर पडले होते. ध्येयसिद्धी झाल्याशिवाय त्यांचें थोडेंच समाधान होणार होतें !

**गुरुमहाराजांची भेट**

फिरत फिरत व ध्यानधारणा करीत ते शेवटी मल्लिकार्जुन क्षेत्रांत आले. भगवंतानेंच त्यांना तेथें आणलें. तुमची निष्ठा प्रखर असली, तुमचें अंतःकरण तळमळूं लागलें म्हणजे भगवंतच तुमचा वाटाड्या होतो. मग तुमच्या भवितव्याची तुम्हांला काळजी वहावी लागत नाहीं. सिद्धारूढांचें तसेंच झालें. ते त्या क्षेत्रांतील कट्टी मठांत गेले. गेले कसले ? भगवंतानेंच त्यांना तेथें ओढून नेलें, तेथील मठाधिपति गजदंडस्वामी यांचें दर्शन घेऊन त्यांना त्यांनीं दंडवत घातले. हेंच त्यांचे गुरू, मठांत गुरूजवळ राहून त्यांची सेवा त्यांनीं निष्काम बुद्धीनें व जीवाभावानें केली व ते गुरुकृपेस पात्र झाले. सद्गुरुच ते, त्यांनीं आपल्या या शिष्यवराची योग्यता ओळखली होती. एके दिवशी ते त्यांना म्हणाले, "तुझी योग्यता थोर आहे. तूं सहजसिद्ध स्थितींत आरूढ झाला आहेत. म्हणून मी तुला 'सिद्धारूढ' हें नांव

देतों. त्यानंतर कांहीं दिवस गुरुसहवासांत घालवून सिद्धारूढ हे तीर्थयात्रेसाठीं बाहेर पडले.

**भक्ताला धडा शिकविला**

तीर्थाटण करून आल्यानंतर सिद्धारूढ स्वामींनीं आपल्या अवतारकार्यासाठीं कर्नाटक प्रांतांतील हुबळी हें स्थान मुक्रर केलें. त्यांचा शिष्यसांप्रदाय कर्नाटक महाराष्ट्र वगैरे अनेक प्रांतांतून पसरलेला आहे. ते आपल्या भक्तांना नामस्मरणाचा उपदेश करीत असत. जसा ज्याचा अधिकार असेल तसा त्याला मंत्र देण्याचा व त्याच्या उद्धाराचा मार्ग दाखविण्याचा त्याचा नित्यक्रम असे. सर्वाभूतीं समभाव स्वतः आचरणांत आणून, इतरास तो धडा गिरविण्यास ते लावीत असत. त्यांना उच्चनीच भाव मुळींच आवडत नसे. पंक्तिप्रपंच किंवा आपणास एक व इतरांस दुसरें, त्याना केव्हांही खपत नसे. जें कांहीं असेल तें सर्वांनीं समभावानें गोड करून खावयाचें.

१९२१ सालची गोष्ट. मुंबईत रहाणारे महाराजांचें एक भक्त आपल्या मुलीसह हुबळी येथें त्यांच्या दर्शनासाठीं गेले होते. मठांत साधुसंतांच्या, अतीथिअभ्यागतांचा फार मोठा जमाव नेहमी असे. गोरगरीबास किंवा जे कोणी आले असतील त्यांना अन्नसंतर्पण होत असे. मुंबइहून भेटीसाठीं गेलेले भक्त एकदां महाराजांपाशीं जाऊन म्हणाले, ‘ महाराज, येथील साधुसंतांना व इतर मंडळींना भोजन घालण्याची माझी इच्छा आहे. आपली परवानगी असावी. ” महाराजांनीं रुकार देतांच त्या भक्तानें दुसऱ्याच दिवशीं तो योग जुळवून आणला. त्यांनीं महाराज व त्यांचे निकटवर्ती अकरा थोर भक्त मिळून बारा जणांसाठीं पक्वान्नांचा वेगळा बेत व इतरांस भात आणि मुगाची आमटी असा स्वयंपाक तयार करण्यास सांगितलें.

**पंक्तिप्रपंच कांहिं करूं नये**

दुसऱ्या दिवशीं बारा वाजतां जेवण तयार होतांच भक्तानें महाराजास भोजनास येण्याची विनंती केली. महाराजांसह बारा जणांची पूजा करण्यांत आल्यानंतर त्यांच्यासाठीं वाढून तयार असलेल्या पक्वान्नांच्या ताटावर त्यांना नेऊन बसविण्यांत आलें. इतर भात आमटीवाली मंडळीहि आपापल्या पाटावर बसली,

महाराजांनी चौफेर नजर टाकली तेव्हां भोजनांत ‘ पंक्तिप्रपंच ’ दिसून आला, त्यांना तो ‘ प्रपंच ’ असह्य झाला, तें पक्वानाचे भोजन त्यांना गोड कसें लागावें ? ‘ उठा, ” या एकाच शब्दांत त्यांनीं आपलें हृद्गत खुलें केलें.

भोजनास हात न लावतां सर्व मंडळी पटापट उठली ? हा देखावा पाहून त्या भक्ताला काय वाटलें असेल हें का वेगळें सांगायला हवें ? तो अत्यंत खजील झाला. एवढेंच नव्हे तर पश्चात्तानें रडूं लागला ? त्यानें महाराजांचे पाय धरले व या अपराधा-

बद्दल क्षमा करण्याची याचना करू लागला. त्यावेळीं महाराजांनीं त्याला अभय देऊन, असा पंक्तिप्रपंच कधींही करू नये; सर्वांच्या अंतःकरणांत एकच परमात्मा आहे. त्याला समाधान होईल अशा समयज्ञतेनें वागावें. याप्रमाणें उपदेश करून नंतर सर्वांनीं मिळून एकाच प्रकारचें भोजन केलें.

### अन्नसंतर्पणांत महापुण्य

अन्नसंतर्पण करण्यांत महापुण्य आहे असें महाराज नेहमीं सांगत असत व हुबळी मटांत तें एकाकाळीं फार मोठ्या प्रमाणावर होत असे. अजूनही तेथें मोठमोठाल्या चुली व अन्न शिजविण्याची मोठमोठालीं भांडीं व पाकशाळा पहायाला मिळतात. समाधिस्थ होण्यापूर्वी तीन वर्षे म्हणजे १९२६ सालीं महाराज आपल्या भक्तांना जवळ बोलावून म्हणाले होते, "अन्नसंतर्पण करण्याची संधि सहसा वायां दवडूं नका. पुढें एक काळ असा यावयाचा आहे कीं, येथील पाकशाळेंत तुम्ही मोठमोठाल्या चुली घातल्या आहेत त्या खणून काढाव्या लागतील. कारण अन्नसंतर्पण करणें पुढें अशक्य होणार आहे. तुम्हांलाच पोटभर अन्न खायला मिळणार नाहीं, मग तुम्ही इतरांना काय देणार?"

आणि तदनंतरच्या काळांत त्यांची ही भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरलेली आजही आपण पहात आहोंत!

आपल्या भक्तकाजासाटीं सिद्धारूढ काय वाटेल तें करायला तयार असत. आपल्या भक्तांना कोणत्याही प्रकारचे दुःख होऊं नये यासाठीं ते जपत असत. संत भक्तीचे भुकेले असतात. देव आणि संत यामध्यें फरक तो कसला? जी देवाची आवड व जी देवाची दृष्टी; तीच संतांची आवड व संतांची दृष्टी,

### भक्तांचें दुःख स्वतःवर ओढून घेतलें

हुबळी येथे प्रती वर्षी माघमासांत सिद्धारूढ मठांत फार मोठा उत्सव होत असे. अजूनही तो होतो. त्या महिन्यात ठिकठिकाणचे असंख्य भक्त मोठ्या भक्तिभावानें हुबळी येथे जमतात व सिद्धारूढ महाराजांचा जयघोष करतात. अशा उत्सवप्रसंगी सिद्धारूढ महाराजांस पालखीत बसवून भक्तमंडळी त्यांना मठापासून तीन मैलांवर असलेल्या जडीप्पाचे मठांत घेऊन जात असत. महाराज तीर्थयात्रा करीत असतां जटाधारी जडीप्पा त्यांना गोकर्ण क्षेत्रांत भेटला. त्यावेळेपासून महाराजांचा भक्त होऊन तो हुबळींतील एका मठांत रहात असे. त्या मठांत महाराजांचें पूजनअर्चन होऊन परत येतांना जडीप्पासह पालखींत बसून महाराज येत असत. परत येतांना दुपारचें कडकडीत उन्ह लागत असे. अनवाणी परत येतांना भक्तमंडळींचे पाय अर्थातच भाजून जावयाचें. परंतु तसें कांहीं होत नसे. एकदां मिरवणुकीनंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुराण सांगण्यासाठीं बसले असतां महाराजांनीं विठ्ठलराव

नांवाच्या आपल्या भक्तास " विठ्ठला; विठ्ठला म्हणून मोठ्यानें हांका मारायला सुरवात केली.

विठ्ठलराव येतांच त्यांना ते म्हणाले, " माझ्या पायाला उन्हांतून अनवाणी फिरल्यामुळें फोड बघ कसे आले आहेत. भक्तमंडळी पालखींतून मिरवली व मी आपला उन्हातान्हांतून चालत होतो, थंड तेल तरी घेऊन ये. "

सिद्धारूढ महाराजांच्या आयुष्यांतील असे भक्तांचें दुःख स्वतःवर ओढवून घेऊन त्यांना दुःखमुक्त केल्याचें दाखले किती तरी सांगतां येण्यासारखे आहेत.

## सिद्धारूढांची शिकवण

प्रत्येक मनुष्यानें दुर्गुणांस यत्किंचितही थारा न देतां सद्गुणी होण्यासाठीं झटावे व आपले कल्याण साधावें. दया, क्षमा, शांति, धैर्य—हे पृथ्वीमोलाचे सद्गुण आहेत यापैकी एक तरी सद्गुण मी माझ्या अंगी बाणविनच बाणवीन असा निर्धार करून प्रत्येक मनुष्यानें तो आचरणांत आणण्यासाठीं मनोभावें झटावें. त्यांतूनच कल्याणाचा व उद्धाराचा मार्ग सांपडेल. एक सद्गुण पूर्णत्वानें अंगी बाणला म्हणजे त्याच्याबरोबर इतर सद्गुणांची जोड आपणांस लाभेल, असें, सिद्धारूढ महाराजांचे आपल्या भक्तास नेहमी सांगणें असें.नामस्मरणावर महाराजांचा फार भर असे. नामस्मरणाने शुद्धि होते व चित्ताची एकाग्रता साध्य करतां येते. अतीथि-अभ्यागतांना अन्न देऊन त्याचा आत्मा संतुष्ट करणें हें महापुण्य आहे, असें ते सांगत असत. सत्शास्त्रश्रवण, निस्सीम गुरुसेवा व मननपूर्वक नामस्मरण हीं आपलें शाश्वत कल्याण साध्य करून घेण्याचीं साधनें आहेत; तीं प्रत्येक भक्तानें हस्तगत करून आचरणांत आणण्यासाठीं सतत झटावें, असें त्यांचें कळकळीचें सांगणें असे. त्यांच्या मागें त्यांचा शिष्यसांप्रदायही हेंच कार्य यथाशक्ति पार पाडीत आहे.

---

—कोणताहि मार्ग ध्या. लोकांना सुखी करा. जीवनाच्या आवश्यक गरजा सर्वांच्या भागल्या पाहिजेत. अन्नवस्त्र, ज्ञान, विश्रांति, आनंद सर्वांना मिळालीं पाहिजेत, आज अशी परिस्थिति आहे कीं सर्वांना या वस्तू देतां येतील नीट योजना मात्र हवी. संशोधनाचा मानवी सुखासाठीं उपयोग केला म्हणजे हें सारें होईल.

—पंडित जवाहरलाल एकदां म्हणाले, " कोटयवधि लोक अन्नवस्त्रास पारखे असता, ज्ञानानंद व कलानंद यांना पारखे असतां, धर्मांच्या व संस्कृतीच्या गप्पा हे लोक मारतात तरी कसे ! " खरें आहे. खरा धर्म अद्याप यावयाचा आहे.

---

# संसार आणि संन्यास

—रमण महर्षि

तुम्हीं संसारी असा किंवा संन्यासी असा. जोंपर्यंत तुम्हीं आपल्या मनावर ताबा मिळवूं शकलां नाहीं तोंपर्यंत तुम्हीं संसारांत राहिलां काय किंवा संन्यासी होऊन जंगलांत गेलां काय तुम्हांला जरूर तें फळ मिळणार नाहीं. तुम्हीं संसार सोडल्यानें काय होणार आहे ? मन तुमचा पिच्छा सोडीत आहे का ? तें तुम्हांला चिकटून राहिलें आहे तें तुम्हांला वाटेल तसें नाचवीत आहे !

सर्व बऱ्या वाईट विचारांच्या बुडाशीं अहंकार आहे. तुमच्या देहावर त्यानें ताबा मिळविला आहे. घरांत रहा किंवा जंगलात जा. जागा बदलल्यानें काय होणार आहे ! मन हें प्रत्येक वेळीं विघ्नें निर्माण करीत रहाणार ! तेव्हां थारेपालट करण्यांत कांहीं फायदा नाहीं. फायदा आहे तो केवळ मनावर ताबा मिळविण्यांत. मन जिंकण्यांत, त्याच्यावर ताबा मिळवा. आणि मग पहा तुमच्यांत क्रांति घडून येते कीं नाहीं ती !

जंगलांत जाऊन तुम्हीं मनावर ताबा मिळविन म्हणतां ? मग या संसारांत राहून तों ताबा मिळवूं शकत नाहीं ? मग स्थान बदलायचें कशासाठीं ? कोणतीही परिस्थिति असो. तुम्हीं जेथें आहां तेथें राहून मनावर बारीक नजर ठेवा आणि मनाला अगोदर जिंका.

तुमच्या अंतःकरणरूपी गुहेंत ' अहं अहं ' म्हणजे साक्षात ब्रह्मच वास करीत आहे. तुमच्या हृदयाकाशांतील तो सूर्यनारायण आहे. त्याला ओळखण्यासाठीं एकाग्र चित्त व्हा. वाटेल तेवढे शिकस्तीचे प्रयत्न करून व आत्मनिष्ठ बनून त्या सूर्यनारायणापर्यंत मजल मारा. त्याला आपल्या पकडींत घट्ट धरा.

अहंकाराचा उदय कोठून होतो याचा शोध करतां करतां तुम्हांला म्हणजे साधकाला मनापर्यंत पोहोंचावें लागेल. त्यासाठीं अंतर्मुख व्हावें लागेल. जो अंतर्मुख होईल त्याला आत्म साक्षात्कार होईल व नदी जशी सागरांत विलीन होऊन सागरांशीं एकरूप होऊन जाते त्याचप्रमाणें तुम्हींही त्या ब्रह्माशीं एकरूप होऊन जाल.

# भेदाभेद नष्ट करा

## एकनाथ महाराजांची शिकवण

**संतकवि श्रीदासगणू महाराज यानी संतचरित्रें लिहिलीं; त्याचप्रमाणें संतांवर कीर्तनाख्यानेंही लिहिलीं. त्यांत एकनाथ महाराजांवरील कीर्तनाख्यान अत्यंत प्रभावी व उद्‌बोधक झालें आहे. त्याचें थोडक्यांत सार—**

एकनाथचरित्रामध्यें पहिल्या भागांत याचकांच्या निरानिराळ्या वर्गांचें वर्णन संत-दासगणू महाराजांनीं केलेलें आहे. त्यांत ब्राह्मण, गोसावी, जंगम व मुसलमान अशा वर्गांतील याचकांचें उद्गार आपआपल्या वर्गाचे हुबेहुब द्योतक आहेत व त्यांना श्री. जनार्दनपंतांनीं दिलेल्या उत्तरांतून महाराजांनीं त्यांची वैगुण्यें हलुवारपणें पण मार्मिकपणें दाखविली आहेत. एकनाथचरित्राच्या चौथ्या भागांत रंगविलेला एक प्रसंग फारच मनोरम आहे.

एकदां एकनाथांनीं आपल्या प्रवचनामध्यें सगळ्या जगतांत विशेष तत्त्व भरलें आहे; जे भेद भासतात त्यांना तात्त्विक दृष्टया कांहींच महत्व नाहीं, असें सांगितलें. या वचनाचा मुसलमानांनीं वेगळ्या अर्थानें फायदा घेण्याचें ठरविलें. मुसलमान म्हणाले—

"एक खाक से बने हुये हैं हिंदु-मुसलमिन दुनियामें
फिर तुम खाना क्यों नहिं खाते आके हमारे मसजिदमें !"

मग नाथ म्हणाले, "माझ्यासारखीच तात्विक भूमिका तुमचीहि असेल, तुमच्यांतून सर्व प्रकारचें भेदाभेद पार नष्ट झाले असतील, तर मग आपण सारखे झालों !" मुसलमान म्हणाले, "हो !" नाथ म्हणाले,

"यापरिचें मन तुमचें झालें असल्या अवश्य येईन ।
भोजन करण्या काजीं, माना हें ना असत्य तुम्हि वचन ॥"

मुसलमान आनंदित होऊन घरीं गेले. नाथांच्या स्वागताची तयारी मशि-दींत अगदीं धूमधडाक्यानें सुरू झाली ! या बातमीनें गांवामध्यें एकच खळबळ उडाली. नाथ बाटणार आणि त्या योगें हिंदु धर्माची नाचक्की होणार, त्यामुळें सर्व हिंदु समाज हा अगदी चिन्ताक्रांत झाला. मोठमोठी माणसे नाथांच्याकडे शिष्टाईस गेलीं. त्यांनीं विचारलें, "नाथा, वेदाचा कंटाळा आला काय ? 'सर्व स्वल्विदं ब्रह्म टाकून

तुम्ही ' ला इलाह इल्लिल्ला ' म्हणणार काय ? तुमच्या बाटण्यानें आमचें नाक कापलें गेल्यासारखें होणार आहे. " नाथ विनोदानें म्हणाले—

" आतां इल्लिल्ला बदला मुखें हो । त्याच्यामुळें कां तुम्ही बाटला हो ! "

शब्दामुळें कधीं तत्त्वांत फरक होतो काय ? तत्त्वनिष्ठ असणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे. खेद करू नका, जो ब्रह्म जाणतो, तो कधींहि बाटणार नाहीं. कारण—

" अभेद रस आंतला वरिल जी त्वचा भेद ती ।
मिळून फळ जाहलें तशिच या जगाची स्थिति ।
रसास उपभोगितां त्यजिति साल त्याची जशी ।
तसेंच मम बोलणें, भव नका धरूं मानसीं ॥ "

नाथांच्या बोलण्याचें मर्म त्या विद्वानांच्याहि नीटसें लक्षांत आलें नाहीं. ते खिन्न मनानें परत गेले. ठरलेल्या दिवशीं नाथास नेण्यासाठीं मुसलमान मंडळी मेणा घेऊन आली. हिंदु समाजांतील उष्ण रक्ताचे युवक हातांमध्यें काठ्या घेऊन मुसलमान समाजावर अगदीं तुटून पडण्याच्या निश्चयानें नाथांच्या वाड्याभोंवतीं गोळा झाले. नाथानीं त्यांना शांत करून सांगितलें,

" कलह नका उगिच करूं समय ना बरा ।
सत्ता ती यवन–करीं ध्यानि हें धरा ॥ "

माझ्याबरोबर चला, काय होतें बघा तरी ! मेण्यांत बसतांना नाथांनीं देवाची प्रार्थना केली कीं, परमेश्वरा—

" धर्मान्तर तें मुळि नच व्हावे तत्व न ढळतां हरी ।
तुजवर ठेवुनि पूर्ण भरंवसा निर्भय मी अंतरीं ॥ "

नाथांना मोठ्या समारंभानें मिरवत मशिदीपर्यंत आणले आणि तेथें ते मेण्यांतून बाहेर येतात, तों एक डुकराचें पिलूं त्यांच्या पायांशीं आलें. त्याला त्यांनीं मोठ्या आनंदानें उचलून घेतलें. आणि ते त्याला म्हणाले, " देवा तुम्ही या रूपानें इथें आलांत फारच छान झालें आतां यवनाच्या वादाचे मूळच संपलें !" डुकराचें पोर पहाताच मुसलमान लोक गडबडले. ते म्हणाले, " याला टाकून द्या. इस्लामानें याला अत्यंत निंद्य प्राणी मानला आहे. " नाथ म्हणाले " छे: ! असें कसें ? आमचे सर्व भेदाभेद संपले आहेत, असें तुम्हीच म्हणालांत ना ? मग आंता हें चांगले आणि वाईट कुठून आणलेंत ? मीं यालाहि परमेश्वराचेंच स्वरूप समजतों. याच्यासह आपण पंगतींत जेवण करूं या. ' मुसलमान तें मानीनात. त्यांनीं हिंदु धर्माची निंदा करण्यास सुरुवात केली. हिंदूंनीं त्यांचीं उणीं काढलीं. एक चार्वाक तेव्हां पुढें आला अन् म्हणाला, " नाथा, एकी होण्याची चांगली संधि आली असतांना तुम्ही मात्र ती उगाचच वायां घालविली. धर्मांमध्यें नीतिनियम व रिवाज हें एक खूळ आहे. या खुळानेंच आजवर माणसामा-

णसांत फूट पाडली. अन् राष्ट्राचें नुकसान केलें. निसर्गसत्ता बलत्तर आहे, त्यामुळेंच सर्व गोष्टी होतात तेथ देव कशाचा ! ”

“ बुद्धिमान हा मनुष्यप्राणी अवध्यांमाजी भला ।

तोच अशा या धर्मखुळानें बैल पुरा बनाविला ॥ ”

त्याचें हें भाषण ऐकून नाथानें त्याला अनेक गोष्टी सुनांवल्या. भेद व अभेद यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. धर्मबंधनांची आवश्यकता स्पष्ट केली व आपल्या म्हणण्याचें रूपकाच्या द्वारानें स्पष्टीकरण करण्यासाठीं ते म्हणाले—

“ आकाशा न ये कोणास गादि घालितां ।

घातली असें जो बोले, तें भाषण त्याचें वृथा ॥

( चाल ) प्रथमतः भूमि उत्तम, पुढें जाजम, असा आहे, नेम पसरण्या गादी-

हें आण मनामध्यें आधि ।

सत्कर्म हीच भू येथ पाहिजे खरी ।

जाजम सगुण भक्तीचें पसरणें तियेच्या वरी ।

( चाल ) मग ज्ञानगादि घालून, बसे जाऊन, ईश होऊन, नको करुं चिंता ।

घे अनुभव तो तत्त्वतां ॥ ”

येथें धर्माधर्मांच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत, तत्त्वज्ञान व व्यवहारांची सांगड या ठिकाणीं कशी डौलदार रीतीनें घातली गेली आहे, तें वाचकांच्या यावरून प्रत्यायास येईल.

---


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

# अध्ययन तत्परता

**"सत्यं वद," "धर्मं चर," या आज्ञांच्या पुढेंच "स्वाध्यायान्माप्रमदः" म्हणजे अध्ययनाविषयीं आळस करूं नको ही आज्ञा आहे. अध्ययन समाप्त करून विद्यार्थी आपल्या घरीं जावयास निघाला असतां गुरूनें त्यास ही आज्ञा केली आहे यावरून एकवार अध्ययन समाप्त झालें तरी पुढें त्याविषयीं दुर्लक्ष होतां कामा नये, असा गुरूचा स्पष्ट अभिप्राय दिसतो.**

मनुष्य प्रपंचांत निमग्न झाला म्हणजे नानाविध कर्तव्यव्यग्रतेमुळें बहुयत्नेंकरून सद्गुरूपासून संपादिलेली विद्या, जिच्या योगानें ज्ञान निर्दोष होतें. विवेक जागृत राहातो, धर्माचरणाविषयीं प्रवृत्ति होते, दुराचारापासून निवृत्ति होते, शाश्वत सुख व अशाश्वत सुख यांचें तारतम्य चित्तांत वागतें, दैवी संपत्तिची प्राप्ति होते. व परमार्थिक कल्याणाच्या श्रेष्ठत्वाविषयीं बुद्धि निश्चयात्मक होते, ती विद्या मलिन होण्याचा फार संभव असतो; व ती मलिन झाली असतां तिजपासून होणारीं पूर्वोक्त अमूल्य फळें हळूहळू नष्ट होण्याची मोठी भीति असते. तसें न व्हावें म्हणून गुरूनें शिष्यास घरीं गेल्यावरही अध्ययनाविषयीं तत्पर राहावें अशी आज्ञा केली आहे. तिचें तात्पर्य हें कीं, प्राप्त केलेल्या विद्येचें यथावकाश पुनः पुन्हा पठन व मनन करीत असावें; व त्या दुसऱ्यासही शिकविण्याचा प्रसंग आला असता अवकाशानुसार दुसऱ्यांसही यथाशक्ती शिकवाव्या.

'स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्'

अधिक विद्यांचें पठनपाठनांकडे दुर्लक्ष करूं नये.

'तद्धि तपः'

तेंच तप होय, म्हणजे जे विद्यासंपन्न झाले त्यानीं चित्तशुद्ध्यर्थं मुख्यत्वेंकरून स्वाध्यायप्रवचनरूप आपलें कर्तव्य निष्ठापूर्वक करावें. प्राचीनकाळीं वसिष्ठनामदेवादि ऋषि, व्यासादि मुनि, व नारदादि महात्मे पुरुषही नेहमी स्वाध्यायनिष्ठ असत, असें त्याविषयीं वर्णन केलेलें आहे. याप्रमाणेंच त्याकाळच्या सर्व विद्वानांची प्रवृत्ति असे. अर्वाचीन काळीही या व इतर देशांमध्यें जे खरोखरी मोठे विद्वान झाले आहेत, त्यांची सतत विद्याभ्यासंगाविषयीं तशीच प्रसिद्धी आहे. आणि सतत

व्यासंगावांचुन विद्या फलावह व कार्यक्षम होत नाहीं. म्हणून खरे विद्वान असतात, ते विद्येच्या संबंधानें आपल्यास कृतकृत्य असें कधींच मानीत नाहींत. जरी एखाद्या विषयीं तो स्वःता पारंगत असले तरी त्यांतील विषयांच्या संबंधानें इतर विद्वानांचें काय मत आहे, ते त्याविषयीं काय लिहितात, हें पाहण्याविषयीं ते सदैव उत्सुक असतात. व कोणी काही नवीन कल्पना काढिली, किंवा विचार सुचविला, तर त्याविषयीं ऊहापोह करून सत्य-निर्णय करण्याविषयीं ते नेहमीं तत्पर असतात त्यांतील जे सात्विकबुद्धिविशिष्ट असतात ते दुसऱ्यानें काढिलेली कल्पना किंवा सुचविलेली गोष्ट खरोखरीच नवी असली, तर तिचा नवीनपणा प्रांजळपणानें एकदम कबूल करितात; व त्या शोधाचे योगानें आपलें त्या विद्येविषयीं ज्ञान वाढलें याविषयीं आपली कृतज्ञता-बुद्धीही दाखवितात. अशा पुरुषांच्या सतत व्यासंगानें निरनिराळ्या विद्याही दिवसानुदिवस अधिकाधिक पूर्णतेस येतात. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे मनुष्यमात्रानें आपण विद्यार्थी देशेंतून सर्वथा निघालो आहों असें कधींही मानितां कामा नये जसे वापरलेले हत्यार नेहमी स्वच्छ व आपले कार्य करावयास समर्थ असतें, तशीच विद्या सतत अभ्यासाने सतेज व करतलामलकवत असते; व एकाच विद्येमध्यें याप्रमाणें बुद्धि सतेज असली म्हणजे एखादी नवीन विद्या संपादन करणें झाल्यास ती अल्पायासानें साध्य करितां येते. याच रितीनें शंकराचार्यांसारखें, सायनाचार्यांसारखे भाष्यकार, व माधवासारखे भट्टोजीदिक्षितासारखे व नागोजी भट्टासारखे सकल शास्त्रपारंगत निबंधकर्ते प्राचीन व आर्वाचीन काळीं होऊन गेले आहेत. या महान विद्वानांच्या अध्ययनव्यासंगाकडे लक्ष देऊन अलीकडील पाठशाळांतून तयार होणाऱ्या विद्वानांनीं सतत आपला विद्याव्यासंग ठेविला पाहिजे. हें त्यांचें अवश्य कर्तव्य होय. हें व्यासंग केलें तरच यापुढें पूर्वीप्रमाणें महापंडित या देशांत उपन्न होण्याची काहीं आशा आहे.

वर जी वेदार्थाची आज्ञा सांगितली आहे ती आजकालच्या विद्यार्थ्यांसही पूर्णपणें लागू आहे. त्यानीही पाठशाळा सोडल्यानंतर अध्ययनाविषयी तत्पर राहिलें पाहिजे. त्याविषयीं आळस किंवा दुर्लक्ष करितां कामास नये. त्यांतही ज्यांस पर-मार्थिक ज्ञान पूर्ण व्हावें अशी इच्छा असेल, त्यानीं परमार्थबोधक जे उपनिषदें, भगवद्गीता इत्यादि ग्रंथ; त्यांचें नित्य परिशीलन केलें पाहिजे. तसें केलें तरच पारमार्थिक विषयांचें यथार्थ ज्ञान त्यांच्या अंतःकरणांत जागृत राहून परमार्थसाधनाविषयीं त्यांची प्रवृत्ति परमार्थबोधक ग्रंथ त्यास येत असलेल्या भाषांमध्यें जे जे सांपडतील त्या सर्वांचें त्यांनीं यथाशक्ति अवलोकन केलें पाहिजे. तेणेंकरून त्यांची बुद्धि व्यापक व

# मन जिंकणें म्हणजे जग जिंकणें!

या जगांत जिकडे जाल व जिकडे पहाल तिकडे गुलामि भरलेली आहे. प्रत्येक जण कोणाचा ना कोणाचा तरी गुलाम आहे. कोणाचाच नसला तर स्वतःच्या मनाचा तरी! आम्हीं सारीं माणसें मनाचे गुलाम होऊन राहिले आहोंत. मन नेईल तिकडे जायचें तें वाकवील तसें वाकायचें! परंतु अशा त्या मनावर आपण ताबा मिळविणें हा सर्वांत मोठा पुरुषार्थ आहे. ज्यानें मन जिंकलें त्यानें सर्व कांहीं जिंकलें.

तुम्हांला दुसऱ्यांवर प्रभुत्व मिळवायचें आहे का? मग प्रथम स्वतःच्या मनावर प्रभुत्व मिळवा, 'प्रभुत्व मिळवा' म्हणणें सोपें आहे; परंतु ती गोष्ट आचरणांत आणणें अत्यंत कठीण आहे. ज्यानें मन जिंकण्यांत यश मिळविलें तो कोणत्याहि क्षेत्रांत गेला तरी यशस्वी होईल. तो राजाधिराज झाला असेंच समजलें पाहिजे.

मन भारी ओढाळ आहे हें आजवर सर्वजण सांगत आले. व आपण तें ऐकत आलो, अशा या मनाला वेसण कशी घालायची व त्याच्यावर ताबा कसा मिळवायचा?

हरघडीं आत्मनिरीक्षण करायचें. संयमाची कांस घट्ट धरायची. उठतां बसतां संयम साधना सुरू ठेवायची. दुसऱ्यांसाठीं झटणें व आपल्याकडून होईल तेवढा दुसऱ्यासाठीं त्याग करणें हेंच आपलें कर्तव्य होऊन रहावें. ईशस्तवन-आराधना हें मनाला वेसण घालण्याचें एक प्रभावी साधन आहे.

जो दृढ निश्चयपूर्वक मनावर ताबा मिळविण्याच्या मार्गाला लागला त्याला मन जिंकणें मुळींच अशक्य नाहीं.

---

विचारक्षम होऊं शकेल. म्हणून त्यांनीं व इतर जे विद्याभिलाषी असतील त्या सर्वांनीं "स्वाध्यान्मा प्रमद" या गुर्वाज्ञेस अनुसरून आपल्यास इष्ट ज्या ज्या विद्या असतील त्यांचा नित्य व्यासंग ठेविला पाहिजे तरच त्यांचा विद्याप्राप्तीविषयींचा मनोरथ सिद्धीस जाईल.




## डिसेंबर १९६४

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची गर्दी नाताळची सुट्टी असल्यानें बरीच होती. कांही कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

### कीर्तन

श्रीमती अनसुयाबाई अनंतराव धुर्ये मुंबई, संस्थान गवई श्री. मराठे यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें एकादशीस व श्री. ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी या दिवशीं झालीं.

### गायन

श्रीमतीबाई नार्वेकर मुंबई, श्री. नागेश रामचंद्र कळंबकर इंदौर ( मध्यप्रदेश ) श्री. विनायकराव जामगांवकर कल्याण, श्री. शनिकुमार आणि पार्टी डोंबिवली जि. ठाणें, सौ. इंदुबाई शंकर सखदेव इंडिरोड स्टेशन जि. विजापूर ( म्हैसुर प्रांत ), श्री. जी. व्ही. क्षीरसागर धुळें ( जि. मा. श्री. शोभना मनोहर जावळे विलेपारले,

### तबलावादन

कुमार अभय दत्ताराम नार्वेकर मुंबई.

### विशेष कार्यक्रम

श्री. दत्तजयंतीनिमित्त श्रीसमाधि मंदिरांत श्रीदत्तजन्मकीर्तन, रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक; भजन दिंडी गारुड भारुड वगैरे. व तिर्थप्रसाद.

### मोठ्या माणसांच्या भेटी

ना. मे. हजरनाविससाहेब पुरवठा मंत्री मध्यवर्ती सरकार दिल्ली, मे. गटणेसाहेब डि. से. जज्ज नासिक, मे. जी. व्ही. क्षीरसागरसाहेब कलेक्टर धुळें.

**हवापाणी**

शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं. थंडी पडूं लागली आहे.

---

## श्रीसाईभक्तांस विनंती

श्री साईबाबांच्या 'हातची उदी' शिरडी संस्थानांकडे देण्यांत आलेली आहे, ही 'उदी' कै. रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांस श्री साईबाबांनीं वेळो-वेळीं दिलेली होती. कोठल्याहि निष्ठावंत साईभक्तांस ती पवित्र उदी पाहिजे असल्यास त्यानें ती शिरडी संस्थानच्या दादर येथील ऑफिसमधून घेऊन जावी. उदीचा उपयोग जरूर लागेल तेव्हांच योग्य ठिकाणीं करावा. विनाकारण वापरून टाकूं नये, असें श्री. एस. एम. व सौ. स्वाती प्रधान कळवितात.

---

—सर्वांत मोठा आवाज देणारा ढोल असतो त्याचा आवाज फार तर फर्लांग-पर्यंत ऐकूं जाईल. ढगाच्या गडगडाट कांहीं मैलपर्यंत ऐकूं जाईल; परंतु तुम्हीं जो परोपकार कराल त्याची प्रशंसा तिन्हीं जगांत ऐकली जाईल.

---

—शेक्सपिअर या इंग्रज कवीनें म्हणून म्हटले आहे कीं, " जें जें तूं करूं पाहशील तें देवासाठीं असो, सत्यासाठीं असो, तुझ्या देशासाठीं असो. " शेक्स्पिअरनें आधीं देश घेतला नाहीं. आधीं देव घेतला, सत्य घेतलें! इंग्रज आपल्या देशाची सेवा करीत आहेत; परंतु हिंदुस्थानची हलाखी करून स्वदेशांची त्यांनीं चालविलेली सेवा ही देवाघरीं रुजू होईल का ? कधींहि नाहीं.

---

आपण नेणते आहोंत ही भावना कधीं सोडूं नये. विहिरींत अपरंपार पाणी असतें, परंतु विहिरींत सोडलेली घागर जर वांकणार नाहीं, तर तें पाणीं तिच्यात कसें शिरेल ! ती अहंकारानें नाचत राहील, तर रितीच राहील. प्रभूचें संगीत सर्व विश्वांत भरून राहिलें आहे. तें तुमच्या आमच्या जीवनांतूनहि प्रकट होईल. परंतु आपण वाकूं तर, विनम्र होऊं तर, त्याच्या हातांतील आपण निमित्तमात्र साधनें आहोंत अशा भावनेनें वागूं तर, अहंकाराचा वारा लागूं न दिला तर, असें करूं तर आपलेंहि हें जीवन कृतार्थ होईल.

---

# तरुणांवरील जबाबदारी


## धर्म व नीतिबंधनें पाळण्याची जरुरी

ज्ञान म्हणजे सामर्थ्य असें म्हणतात. पण ज्ञानाचा आपलपोटेपणांतच जर अंत व्हावयाचा असेल व उदरभरणापुढें त्याची मजल जात नसेल, तर त्या सामर्थ्याचा यथायोग्य उपयोग झाला असें म्हणतां येणार नाहीं. पशुपक्षांनाहि पोट भरण्याचें ज्ञान असतें. पण मनुष्य व पशुपक्षी ह्यांत फरक हाच आहे कीं, मनुष्याला परमेश्वरानें मनुष्यजातीची, विशेषतः आपल्या लोकांची, उन्नति करण्यास लागणारें सामर्थ्य व बुद्धि दिली आहे, ती पशुपक्ष्यांना नाहीं. सुखोपभोगांत दक्ष असणाऱ्यांना खिस्तानें "उद्यांची काळजी वाहूं नका, खाण्यापिण्याविषयीं विशेष विचार करूं नका, प्रथमतः देवाच्या राज्याकडे लक्ष लावा, म्हणजे संसाराच्या सर्व वस्तु तुम्हाला मिळतील." म्हणून जो उपदेश केला आहे. तो निरर्थक भासण्याचा संभव आहे. पण इतिहासाची सीक्ष अशी आहे कीं, राष्ट्राचा अभ्युदय होतो तो आपलपोट्या माणसांमुळें होत नाहीं, तर जीं माणसें आपल्या सुखाचा व चैनीचा फारसा विचार न करितां आपलें तन--मन--धन जनसेवेला अर्पण करितात, अशा नरवीरांमुळेंच होतो. इतिहासामधून अशा माणसांचीं चरित्रें काढून टाकलीं असतां तो शून्यवत् होईल. राष्ट्राचें वैभव जर स्वार्थत्याग करणाऱ्या, किंबहुना राष्ट्रासाठीं आपले प्राण खर्ची घालणाऱ्या मनुष्यांवर अवलंबून आहे, तर प्रत्येक विद्यार्थ्यानें अशा मनुष्यांची उदाहरणें पाहून आपलें जीवन, आपल्या आकांक्षा व उत्साह उज्ज्वल करावयास नको काय? ही कल्पना आपल्या स्वभावाचें प्रतिअंग व्हावें म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यानें आतांपासून आपल्या बुद्धीची व आध्यात्मिक गुणांची वाढ करण्यास शिकलें पाहिजे. कारण हे गुण म्हणजे खऱ्या देशाभिमानाचा पाया होय.

हें साध्य व्हावें म्हणून तुम्हीं एव्हांपासून स्वकर्तव्याविषयीं उच्चत्तम ध्येयाची कल्पना मनांत आणली पाहिजे. जगावयाचें तें चैन करण्यासाठीं, ही जीवनाची कल्पना भ्रामक असून, जीवन म्हणजे कर्तव्यनिष्ठा, हीच कल्पना खरी आहे. परमेश्वरानें आपल्याला विनाकारण जन्मास घातलें नाहीं, त्यांत त्याचा कांहींतरी उच्च हेतु आहे. आपण जन्मास येऊन अशी कांहीं तरी करणी करावी कीं, तिचा लाभ सर्वांना नेहमीं घेतां येईल. पुष्कळ दिवस टिकणारें कृत्य म्हणजे सत्कृत्य होय. आमचें हें

जीवन, दुसऱ्याचें जीवन सुखाचें करण्याकरितां म्हणून आहे. स्वकर्तव्याविषयीं उच्च ध्येय म्हणजे जीवनाविषयीं उच्च ध्येय; तें कसें तें तुम्हांला सांगतों. जीविताचें उच्च ध्येय म्हणजे काय हें अगदीं थोडक्यांत सांगतां येण्यासारखें आहे, परंतु त्याची तुम्हांला चांगलीच उमज व्हावी. म्हणून तें जरा विस्तृतपणें सांगणें भाग आहे. जीविताचें उच्च ध्येय म्हटलें कीं, त्यांत तीन कल्पनांचा मुख्यतः समावेश होतो. त्यांतील पहिली कल्पना ही आहे कीं, मनुष्याचा जन्म हा त्याच्याच स्वतःसाठीं नसून तो इतरांसाठींही आहे, आपल्याच कुटुंबापुरता नसून देशासाठींही आहे. आपण एकमेकांचें महत्व जाणून एकमेकांच्या उपयोगी पडल्याविना आयुष्यांतील व्यवहार चालणार नाहींत. उपजल्यापासून हरएक वस्तूसाठीं आम्हांला दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें. ज्याचें जीवीताचें ध्येय उच्च दर्जाचें असतें, त्याला आपला जन्म सर्वांकरितां आहे हें मान्य असतें. मनुष्य आपली व आपल्या कुटुंबाची काळजी वाहूं लागला म्हणजे तो दुसऱ्या कोणाच्याही उपयोगी पडत नाहीं. पण जो आपल्या देशबांधवांची सेवा करितो, तो ती करीत असतां आपलीही सेवा बजावितो. मोठ्यामध्यें लहानाचा समावेश होतो, हें जें भूमितीचें अबाधित तत्व त्या तत्वाप्रमाणें त्याचें वर्तन होत असतें. मी केवळ माझ्याचपुरता नाहीं, ही उच्च जीवितध्येयाची पहिली कल्पना होय.

इतकेंच नव्हे तर या कल्पनेंत आणखीही खोल अर्थ आहे. तो हा कीं; देशसेवा करावयाची ती अंधपणानें किंवा अविचारानें न करितां शांतपणानें केली पाहिजे. मनुष्याची सेवा करण्याचें जसे दोन प्रकार आहेत तसे देशसेवेचेही आहेत एखाद्या मनुष्याचें हित व्हावें, त्याचें कल्याण व्हावें, अशी आपली इच्छा असली तर आपण कोणत्या मार्गानें

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA
शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)

[ चष्म्यांचे व्यापारी ]
यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील
छबिलदास रोड, दादर (W. R.),

अवलंबन करूं बरें ? त्या मनुष्याचे गुणावगुण काय आहेत, हें आपण प्रथमतः शोधून काढून त्याची खुशामत न करितां, आपण सर्वगुणसंपन्न आहों अशी त्याची समजूत होऊं न देतां त्याच्या उणीवा त्याच्या नजेरस आणून त्याला सन्मार्गाला लावण्यास आपण झटणार नाहीं काय ? लोकांना त्याच्यासंबंधानें काय वाटतें हें आपण त्याला सांगणार नाहीं काय ? एखाद्यास मोठेपणा प्राप्त करून द्यावा असें आपणांस वाटल्यास ' बाबा तूं आपली खरी योग्यता जाण आपण अपूर्ण आहों, आपल्या प्रगतीला कधींहि अंत नाहीं, प्रत्येक गोष्टीपासून आपणाला कांहीं तरी शिकतां घेण्यासारखें आहे, ' असाच उपदेश आपण त्यास करणार नाहीं काय ?

जो गर्वानें फुगून जाऊन सर्वज्ञतेची घमेंड बाळगितो, अशा मनुष्याला आपण चहातों, कीं जो न्यूटनप्रमाणें आपणाला येतें तें कांहींच नाहीं, अजून पुष्कळ शिकावयाचे आहे, असें मानतो त्याला ? अर्थात् दुसऱ्या प्रकारच्या मनुष्याला. व्यक्तीविषयी हें जसें खरें आहे, तसें राष्ट्रासंबंधानेंही आहे. कारण राष्ट्र म्हणजे व्यक्तिसमुदाय होय. व्यक्तीची स्तुति केली असतां, आपण पूर्ण आहों अशी तिची भावना होऊन तिची अवनति होण्याचा संभव असतो. राष्ट्रासंबंधींही असेंच आहे. आपण प्रगतीच्या शिखरावर पोंहोंचलों असें मानणें म्हणजे अवनीतीची तयारी करण्यासारखे आहे.

कर्तव्यासंबंधाच्या भ्रामक कल्पनेनें व खोट्या अभिमानानें देशाची अधोगती होण्याला वेळ लागत नाहीं. जो मनुष्य राष्ट्राच्या अवगुणांकडे दुर्लक्ष करितो व वेळीं अवेळीं त्याचे पोवाडे गाण्यांत कालक्षेप करितो, तो देशसेवा करितो, असें म्हणतां यावयाचें नाहीं. उलट पक्षी ज्याचें कर्तव्यध्येय उच्च आहे, तो आपल्या देशाची स्थिति कशी आहे, त्याच्या ठिकाणीं गुण व अवगुण कोणते आहेत, अवगुण कसे काढून टाकितां येतील, देशाची सुधारणा कशी करितां येईल, इत्यादि गोष्टींचा विचार करण्यांत व कार्य घडवून आणण्याचे कामी आपल्या आंगचा उत्साह खर्च करितो; अशाच मनुष्याला स्वदेशाभिमानी हें नांव देतां येईल. रे. फादर डिडन नांवाच्या एका फ्रेंच ग्रंथकारानें जर्मन लोकांसबंधानें एक पुस्तक लिहिलें आहे. जर्मन लोकांचा अभ्युदय कां होत आहे, फ्रेंच लोक अवनतीप्रत कां जात आहेत, याचा विचार करितांना सदरहू ग्रंथकार म्हणतो, " स्वतःला भलत्याच भ्रमांत न पाडतां व देशाची विनाकारण स्तुति न करितां मी आपल्या देशासंबंधानें आपले विचार प्रगट करीत आहे. फ्रान्स देशावर माझे पूर्ण प्रेम आहे व त्याची निरपेक्षतेनें सेवा करण्यास मी तयार आहे. " या वाक्यांत कर्तव्याच्या उच्च ध्येयासंबंधाच्या दुसऱ्या कल्पनेचा अन्तर्भाव होतो. देशावर आपलें खरें प्रेम असल्यास त्याची व्यंगें घालविणाऱ्याचा आपण द्वेष करितां कामा नये, उलट प्रेम आहे म्हणूनच व्यंगें समजून घेऊन देशसेवा बजाविली पाहिजे.

वर उल्लेखिलेला ग्रंथकार म्हणतो "मी ताठा, द्वेष, व मत्सर ह्यांनीं बनलेल्या देशाभिमानाच्या विरुद्ध आहें; अशा देशाभिमानाची दृष्टि लांववर पोहोंचत नाहीं. कर्तव्य हेंच ज्यांचें उच्च ध्येय आहे ते अदूरदर्शी देशाभिमानाला तुच्छ मानतात." आम्ही सुधारलेले होतों तेव्हां युरोपियन लोक रानटी स्थितींत होते; तेव्हां आम्हां हिंदी लोकांना युरोपिअनांनीं उपदेश करण्याचें प्रयोजन नाहीं, असें अशा लोकांना वाटत नाहीं. उन्नत स्थानाप्रत पोहोंचलेले आम्ही आतां अवनतीप्रत कसे आलों व जे पूर्वी रानटी होते त्यांची आतां सुधारणा कशी झाली, ह्या विचारानें आमचें मन भरून जातें. जो लोकांना न भितां त्यांचीं व्यंगें स्पष्टपणें त्यांना कळवितो, जो निरपेक्ष बुद्धीनें देशसेवा करितो, व्यक्तीला आत्मज्ञानाची जरूरी आहे तशी देशालाही आहे असें स्पष्टपणें प्रतिपादितो. जो लोकाराधना करून तात्पुरती लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, काळास अनुसरून प्रगति करूं, नाहीं तर मरूं. असें निर्भीडपणें कथन करतो तोच खरा देशाभिमानी पुरुष होय.

येथपर्यंत कर्तव्याच्या उच्च ध्येयांत समावेश पावत असलेल्या दोन कल्पना आपल्यापुढें मांडल्या आहेत. एवढ्यानेंच ध्येयाची व्याख्या संपूर्ण होत नाहीं. मनुष्य अंधभक्तीनें देशसेवा करील तर ती खरी देशसेवा होणार नाहीं. त्याचप्रमाणें एका विवक्षित बाबतींत बजावलेली सेवाही खरी देशसेवा नव्हे. देशाचें वैभव व कल्याण ज्यांवर अवलंबून असतें त्या सर्व गोष्टींत त्याची प्रगति होईल, अशी सेवा ही खरी सेवा होय. देशाचें सुख व अभ्युदय, नीति व वैभव हीं त्याच्या शासनपद्धतीवर व धार्मिकतेवर अवलंबून असतात. मनुष्य हा केवळ एखाद्या सत्ताधिपतीची प्रजा व


# MATUNGA CLEANING WORKS

**ESTD. 1934** *Prop.* **S. V. PRADHAN**

MODI NIWAS, BOMBAY 19

**Washers, Dyers and Dry Cleaners.**

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक: एस्. व्ही. प्रधान

नागरीक नसून समाजाचा एक घटक आहे. इतकेंच नव्हे तर तो विवेक व नैतिक सामर्थ्यानें युक्त असा मन असलेला प्राणी आहे. सरकाराच्या कायद्यानीं त्याचें शील बनण्याला जसें सहाय्य होतें, तसेंच किंबहुना त्याहूनही अधिक समाजाचीं बंधनें व धार्मिक कल्पना ह्यांनीं त्याचें शील व स्वभाव बनण्याला मदत होते, व ह्यांवर त्याचें सुखदुःखही अवलंबून असतें. शासनपद्धति अस्तित्वांत आहे, व तिची जोंपर्यंत अवश्यकता आहे, तोंपर्यंत मनुष्याचें पहिलें कर्तव्य म्हटलें त्या पद्धतीच्या ठिकाणीं निष्ठा ठेवून तिचें कार्य उत्तम प्रकारें पार पाडण्यास मदत करणें हें होय. मनुष्याचा संच कायम राखण्याला समाजाची जोंपर्यंत आवश्यकता आहे, तोंपर्यंत त्याचीं बंधनें व व्यवस्था नीट राखून समाजाच्या घटकामध्यें धाडस, नीति व प्रगति ह्यांची वाढ करण्यास मनुष्यानें झटणें, हेंही त्याचें कर्तव्यच होय. त्याचप्रमाणें मनुष्य हा चैतन्यमय प्राणी असून परमेश्वराला हरएक बाबतींत जबाबदार आहे, म्हणून आपल्या बंधुभगिनी परमेश्वराच्या मार्गाचें अवलंबन करतील अशी तजवीज करणें, हेंही त्याचें कर्तव्य होय. सरकार, समाजबंधनें, व धर्म या तीहींनीं मनुष्याची वाढ होत असते. मनुष्यांचें सुख वृद्धिंगत व्हावें व त्याची प्रगति व्हावी, ह्यासाठीं ही तीनही प्रागतिक असलीं पाहिजेत. ह्या तिहींपैकीं कोणतेंही एक चांगलें व दोन वाईट असून चालावयाचें नाहीं. आमच्या सर्व मागण्या सरकारनें कबूल केल्या, पण आमची समाजबंधनेंच अशी असली कीं, त्यामुळें आमची प्रगति न होता पाऊल मागें मागें पडत आहे, तर सरकारच्या उदारपणाचा काय उपयोग होईल बरें? एका फ्रेंच ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं एकाद्या नमुनेदार घरांत मनुष्याला ठेविलें तरी तो नमुनेदार होईल असें नाहीं. त्याची उन्नति झाल्याशिवाय त्याच्या हातून कार्यभाग व्हावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें सरकार सर्वोत्तम असलें तरी मनुष्येंही त्याच्याप्रमाणें झाल्याशिवाय शासनपद्धतीचा त्यांना व्हावा तसा उपयोग होणार नाहीं. उलट ते त्या पद्धतीला आपल्याच पायरीवर आणून पोंहोचवतील. सामाजिक कायद्याविषयींही हेंच खरें आहे. धार्मिक बाबींसंबंधी विचार करतां असें स्पष्ट दिसून येते कीं, धर्मांवर विश्वास असल्याशिवाय राष्ट्राचें अस्तित्वच कायम रहावयाचें नाहीं. शुद्ध व पवित्र धर्म तत्वांच्या पायावर सामाजिक व राजकीय संस्थारूपी इमारती उभाराव्या तेव्हांच त्यांना कायमपणा प्राप्त होतो. आपण एकाच परमेश्वराची बालकें असून तो आपली सर्व कृत्यें पहातो व आपली उन्नति करितो; ह्या तत्वाची साक्ष पटली म्हणजे आपण सर्व बंधु असून एकमेकांसाठीं झटणें, हे आपलें कर्तव्य आहे हें मनुष्याला समजूं लागेल. धर्माशिवाय मनुष्यांना संघटित करण्यास अन्य कोण समर्थ आहे! तुम्ही म्हणाल कीं, मानवी हिताहिताची उमज हें काम करील. निसर्गतःच मनुष्यांना एकमेकांच्या मदतीची आवश्यकता असल्यामुळें त्यांना एकमेकांवर प्रेम करणें व एकमेकांशीं सहानुभूतीनें वागणें भाग


आहे. पण मनुष्य हा स्वार्थी प्राणी आहे. अशी निसर्गच साक्ष देत नाहीं काय ? एकमेकांशिवाय चालत नाही. म्हणूनच जर दोन माणसें एकमेकांशीं शांतीनें रहात असलीं तर त्यांना एकमेकांची जरूरी नाहीं, असें दिसून आल्याबरोबर ती भांडून मारामाऱ्या करणार नाहींत काय ? चॅनिंग नांवाच्या एका अमेरिकन ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, देव व भविष्यकालीन जीवित ह्यासंबंधांच्या आमच्या कल्पना नष्ट झाल्या तर सर्व समाजसंस्थारूपी इमारत डळमळीत होऊन धाडकन् कोसळून पडेल. व पुन्हां तिची उभारणी होण्याची आशाही राहणार नाहीं. त्याचे पुढील विचार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. " आपलें जीवित म्हणजे केवळ लीला आहे, मानवीं गोष्टींशीं देवाचा कांहीं संबंध नाहीं, दुबळ्यांचा व दुःखितांचा कोणी त्राता नाहीं, सत्यानें वागण्याचा व जनहितासाठीं केलेल्या स्वार्थत्यागाचा मोबदला नाहीं, आपण घेतलेली शपथ देवाला ऐकूं जात नाहीं, गुप्तपणें केलेले गुन्हे करणाऱ्याशिवाय कोणाला समजत नाहींत, मानवी जीवित हेतुरहित असून गुणांचा कोणी चहाता नाहीं, प्राण आहे तोंवर आहे, आपण मेलों म्हणजे सर्व संपलें अशा प्रकारच्या मनुष्याच्या कल्पना होऊन त्यांनीं एकदां कां धर्माला फांटा दिला म्हणजे पुढें जे परिणाम ओढवतील, जी वाट लागेल, तिचे वर्णन करण्यास कोण समर्थ होईल बरें ? सदाचरणानें राष्ट्रोन्नति होते, अशी जी म्हण आहे, ती निरर्थक आहे, असें समजूं नका. इतिहास टाहो फोडून हेंच सांगतो आहे कीं, धर्मविषयक कल्पना अवनत झाल्या म्हणजे देशाची धुळधाण होते. अज्ञानवाद व निरीश्वरवाद ह्यांची वाढ राष्ट्रीय जीवनाच्या आड येते. " फ्रुड हा मोठा इतिहासकार होऊन गेला. तो म्हणतोः—" नीतितत्व चिरकालीन आहे; न्याय व सत्य हीं शाश्वत टिकणारीं आहेत. अन्याय व असत्य ह्यांचा कितीही दिवस जय झाल्यासारखा दिसला तरी फ्रेंचराज्यक्रांति किंवा अशाच दुसऱ्या भयंकर मार्गांनीं त्यांचा नाश होतो. कार्लाइलनें म्हटलें आहे—' धर्माची महति मोठी आहे, तो जीवनदायक आहे. राष्ट्र श्रद्धावान होतांच त्याचा इतिहास फलदायक व उन्नत्तिकारक असा होतो ' थायर नांवाच्या एका फ्रेंच मुत्सद्याचें म्हणणें असें आहे कीं, ' ज्या राष्ट्रांत श्रद्धावान मनुष्यें पुष्कळ, त्याच्याच हातून धाडसाचीं कार्यें होतात, व त्याला आपल्या धर्माचा बचाव करण्याचा प्रसंग येतो. तेव्हां तर तें राष्ट्र अचाट धाडसाचीं कृत्यें करतें ' एम. बॅथाम एडवर्डस ह्यानें ' पश्चिम फ्रान्सांतला एक वर्षाचा वास ' ( A year in Western France ) ह्या नांवाचे एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो कीं, मानवांच्या वाट्याला येणारी नैतिक व सांपत्तिक दुःखें नाहींशीं करण्याकरितां धार्मिक व गरिबांना सहाय्य करणाऱ्या संस्थानीं झटलें पाहिजे. शिक्षण, दळणवळण, शास्त्रीय शोध, सामाजिक व राजकिय स्वातंत्र्य इत्यादिकांची वाढ म्हणजे, सुधारणेचा अर्धा भाग

होय. त्यांचे परिणाम चांगले व्हावयाला धर्म व श्रद्धा ह्यांची जोड त्यांना मिळाली पाहिजे." मागें ज्या फ्रेंच ग्रंथकाराच्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे, तो म्हणतो सुव्यवस्थित संस्थांमुळें लोकांचें सामर्थ्य व जोम हीं वाढतात. ह्याच्या उलट स्थिति म्हणजे विनाश व मरण होय. जर्मनींत धर्म, भौतिक शास्त्र, सैन्य, धन, मान ह्यांची अशी कांहीं रचना केलेली आहे कीं त्यामुळें राष्ट्राच्या वैभवाची वाढ ही झालीच पाहिजे. ह्यावरून राष्ट्रांना जी स्थिति प्राप्त होते, ती शासनपद्धति, समाज व धर्म ह्यांमुळें होय; म्हणून ह्याविषयीं राष्ट्रांनीं काळजी घेणें रास्त आहे. आम्हीं हिंदीजनांनीं व विशेषतः माझ्या तरुण मित्रांनीं हें विशेष रीतीनें लक्षांत ठेवावें. येथें आम्ही आमच्या राजकीय संस्थांच्या द्वारें लोकांना अधिक सुस्थिति प्राप्त करून घेण्याला शिकवीत आहों. सरकाराशी निष्ठेनें राहून त्याचे दोष दाखवून आपली स्थिति सुधारण्याला आम्ही शिकवीत आहों. परंतु आमचा धर्म व जातिभेद ही जोपर्यंत आम्हांला निष्कारण बंधनानीं बद्ध करावयास तत्पर आहेत तोपर्यंत आमच्या शिकवण्याचा काय उपयोग आहे ? इंग्लंड देशांत थोडासा अन्याय झाला कीं लोक त्याविषयीं ओरड करतात. आम्ही अशावेळीं कपाळाला हात लावून नशीब आमचें, असें म्हणत स्वस्थ बसतों ! आम्ही कित्येक शतकें दैववादाचे दास होऊन बसलों आहों आणि हा आमचा राष्ट्रीय अवगुण होऊन राहिला आहे. ह्याचें उच्चाटन होईपर्यंत इतर धडपड व्यर्थ आहे. राष्ट्रीय सभेच्या द्वारें आम्ही लोकांपुढें उन्नतीच्या तत्वांची मांडणी करितों तर दुसरीकडे दैववादाचें अवलंबन करून त्यावर पाणी सोडित असतों. असलें परस्परविरोधी वर्तन आम्ही सोडले पाहिजे. राजकीय मोठेपणा हा धार्मिक व सामाजिक वैभवावर अवलंबून आहे. हें लोकांच्या आम्हीं नजरेस आणिलें पाहिजे.

कर्तव्याचें उच्च ध्येय म्हणजे काय हें मी तुम्हांला आतां एका शब्दांत सांगतों. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून तुमच्या ध्यानांत आलेंच असेल कीं ह्या ध्येयांत तीन कल्पनांचा समावेश होतो. पहिली कल्पना ही कीं आपण आपल्या सुखासाठीं जन्मास आलेले नसून देशासाठीं आलों आहों. दुसरी, देशाची निरपेक्षबुद्धीनें सेवा केली पाहिजे; व तिसरी, ती सेवा एकांगी नसून ज्यावर राष्ट्राची उन्नति अवलंबून आहे अशा सर्व बाजूंनीं म्हणजे राजकीय सामाजिक व धार्मिक बाजूंनीं ती केली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्राची सर्व बाजूंनीं उन्नति होईल अशा प्रकारें त्याची धार्मिक, सामाजिक व राजकीय सेवा करणें ह्यासाठीं आपला जन्म आहे, अशी भावना राखणे ह्यालाच कर्तव्याचें उच्च ध्येय असें म्हणतात.

तुम्हांला कदाचित् असा प्रश्न करावासा वाटेल कीं कर्तव्याचें उच्च ध्येय ठरवून त्याप्रमाणें वागण्याची आम्हांला काय आवश्यकता आहे ? काय आहे, ती मी सांगतों. तुम्ही जें शिक्षण मिळवीत आहां त्यामुळें तुम्हाला आपल्या देशाचें नेतृत्व प्राप्त होणार

आहे, समाजांतली सुसंस्कृत व्यक्ति ह्या नात्यानें तुम्हीं समाजाच्या "मनाच्या" ठिकाणी आहां. जगावर विचारी पुरुषांचें राज्य चालतें, तें खोटें नाहीं. "जो वांचतों तो अधिकार चालवतो," अशी एक इटालियन लोकांमध्यें म्हण आहे तिचा अर्थ असा आहे कीं, सर्व गोष्टीचा विचार केला असतां सुशिक्षित व विचारशील पुरुषांचेंच जगावर वजन पडतें. लॉर्ड बिकन्सफील्ड ह्यानेंहि म्हटलें आहे—"मजबूत बाहूंचें राज्य चालविण्याचे दिवस नाहींसे होऊन आतां मजबूत मनाचे दिवस आले आहेत. दांडगाई उच्च स्थानापासून भ्रष्ट होऊन तिच्या ठिकाणीं अकलेची प्रस्थापना झाली आहे. श्रीमंत व दांडगट मनुष्याचें राज्य संपून ज्ञानवानांच्या राज्याला सुरवात झाली आहे. म्हणूनच देशाचे खरे नेते त्यांतील सुशिक्षित माणसें होत. ह्यासाठीं तुमचें ध्येय उच्च असलें पाहिजे. ज्या मानानें तें उच्च असेल त्या मानानें साधारण जनतेचें ध्येय उच्च होईल. खावें, प्यावें व मजा मारावी, देश बुडाला तरी हरकत नाहीं अशीच जर तुमच्या ध्येयाची कल्पना असेल तर खालील वर्गाचें ध्येय अत्यंत अवनत देशप्रत पोहोंचलेले असले तर त्यांत नवल नाहीं. शिक्षित पुरुष देशाचे खरे प्रतिनिधी असल्याकारणानें आपलें कर्तव्यध्येय उच्चतम बनविण्याची त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे.




॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति

बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य व मैत्रेयी यांच्यातील संवाद एके ठिकाणीं दिलेला आहे. हा संवाद व्हावयास कारण काय झालें तें सांगितलें पाहिजे. याज्ञवल्क्य इतर लोकांप्रमाणेंच संसार करीत होता. त्याला दोन बायका होत्या. बऱ्याच वर्षांनीं त्यानें आश्रमांतर करून गृहत्याग करण्याचा निश्चय केला. वनांतरीं जाऊन ईशभजनपूजन करावें, हा त्याचा हेतु होता. परंतु आश्रमांतर करतेवेळीं गृहस्थाश्रमांतील जीं आपलीं मुलेंमाणसें त्यांचा विचार घेऊन, त्यांच्या आशा व इच्छा तृप्त करून गेलें पाहिजे, असा नियम आहे. त्याचप्रमाणें त्यानें मैत्रेयीस आपलें मनोगत कळविलें. आपला पति आश्रमांतर करून वनांतरी आपल्या ताब्यांत गृहधन वगैरे करून जात आहे हें पाहून मैत्रेयी म्हणते—"हें धन, हें गृह घेऊन मला काय करावयाचें आहे? ह्यापासून मला काय उपयोग होईल? हे आज आहे तर उद्यां नाहीं. ह्या ऐहिक धनानें मनाला अमरत्व प्राप्त होणार आहे काय? ज्याच्या योगानें मला अमरत्व प्राप्त होणार असें कांहीं तरी द्या. ज्या सुखाला कधीं खळ नाहीं, असे कांहीं तरी मला प्राप्त करून द्या.' ही आपल्या पत्नीची अखेरची इच्छा पाहून याज्ञवल्क्यास फार संतोष झाला. त्याची स्त्री बहुश्रुत विद्वान म्हणून तिनें असा प्रश्न केला. पण साधारण मनुष्याला असा आश्रमांतर करण्याचा जर प्रसंग आला, तर आपल्या स्त्रिया, मुलें, इतर आप्त, आपल्याजवळ आपली अखेरची इच्छा म्हणून काय प्रदर्शित करितील? तर पुत्रसंतान असावे, धन बरेंचसें संग्रहीं असूं द्यावें, घरदाराची व्यवस्था चांगली झालेली असावी, अशाच तऱ्हेच्या आपल्या इच्छा तीं प्रदर्शित करितील. म्हणजे अशा वेळीं जो तो आपल्या अपेक्षेचे विषय मागणार. ह्यांत त्या निरनिराळ्या वस्तु मागणारांचा परोपकाराचा असा कांहीं भाग नसतो. वस्तुस्थितीच मुळीं अशी आहे— नवऱ्याला बायको जी हवी ती बायकोच्या कल्याणासाठी नव्हे; तर आत्म्याच्या कल्याणासाठीं. पुत्राला बाप हवा, बापाला पुत्र हवा, तो अनुक्रमें बापाच्या व पुत्राच्या कल्याणासाठी नव्हे, तर त्याच्या आत्म्याच्या कल्याणासाठीं. आज देवयोनीतील अनेक देव जे आहेत ते त्या देवांच्या कल्याणासाठीं नसून आत्म्याच्या कल्याणासाठीं होत. हे सर्व विषय आत्म्याच्या शांतीसाठीं हवे असतात. आत्मा त्यांचे शांतीसाठीं नव्हे, हे सर्व विषय सापेक्ष आहेत.

आत्मा ह्या शब्दाचा एक प्राकृत अर्थ करीत असतात आणि हाच अर्थ बहुतेक

प्रचारांत आहे. तो असा कीं, आत्मा म्हणजे आपण. पण हा अर्थ याज्ञवल्क्याचा नव्हे. त्यानें आपल्या पत्नीला जो उपदेश केला व त्यांत हे सर्व विषय आत्म्याच्या कल्याणासाठीं असें जे म्हटले आहे तेथें हा प्राकृत अर्थ असणें शक्य नाहीं. तर जो आत्मा सर्वांच्या ठिकाणीं आहे, जो आत्मा परमात्मा आहे, त्याच्याकरितां हे सर्व असा त्याचा अर्थ. खरें कल्याण, खरें प्रेम ह्या सर्वांचें बीज ज्याचें त्याचें कल्याण व्हावें हें नव्हे. आपण एकमेकांवर प्रीति कां करितों ? एकमेकांविषयीं एवढी कळकळ कां बाळगितों ? कारण, आपण पृथक दिसतों खरे, पण आपण पृथक नाहीं. जो पिता, तोच पुत्र. तीच पत्नी, तीच माता, तोच स्नेही. म्हणजे ह्या सर्वांच्या अंतर्यामी एक आत्मा आहे. तो प्रेममय आहे. परस्परांशीं प्रेमभावानें असावें, हा त्याचा गुण आहे.

सृष्टि रम्य कां वाटते ? तर त्या आत्म्याची छाया प्रत्येक ठिकाणीं उत्पन्न होऊन ती सृष्टि उल्लसित होत असते, सर्व शरीराला सुई टोंचली असतां एकत्व देणारा ज्याप्रमाणें आपला आत्मा, त्याप्रमाणें सर्व व्यक्तीला एकत्व आणणारा हा अंतरात्मा आहे. हें जाणणें हा वेदांताचा सिद्धांत समजतात.

उपनिषदें होण्यापूर्वी कर्ममार्गाची प्रसिद्धि होती. पुण्यकर्म कां करावयाचें, तर पुत्र, धन, दारा हीं प्राप्त व्हावीं म्हणून. परंतु उपनिषदें झाल्यानंतर ह्यापेक्षां खोल विचारांत लोक गेले. धन कितीही प्राप्त झालें तरी तें थोडेंच. त्यापेक्षां जास्त प्राप्त झालें तरीही तें थोडेंच. ज्ञान वाढलें, तरी त्याला मर्यादा आहेच. आयुष्य कितीही वाढलें, तरी तें सापेक्ष. त्याला मर्यादा आहेच. यांत चित्ताची शांति नाही. ह्यापासून खरें समाधान प्राप्त होत नाहीं. असा विचार होतां होतां असें दिसून आलें कीं, माझ्या ठिकाणीं जसा आत्मा आहे तसा सृष्टीच्या ठिकाणीं परमात्मा आहे. त्याच्याशीं सर्वांचा संबंध. त्याचे आम्ही दास. त्याची लीला सर्वत्र प्रसृत आहे. त्याची आपण छाया आहों. त्याचा अंश आपल्या ठिकाणीं असला पाहिजे. असे होता होतां वेदांताच्या मतांप्रमाणें तो व आपण एकच, त्यांच्यांत व आपल्यांत कांहीं फरक नाहीं, असें मानण्यापर्यंतही मजल गेली.

एकाद्या कांचेच्या तुकड्यावर सूर्याचे किरण पडले असतां जी छाया पडते ती छाया व सूर्य एकच, असें म्हणणें अगदीं चुकीचें होईल. छाया ती छाया व सूर्य तो सूर्य. तद्वत् आत्मा व परमात्मा एकच खरे. पण त्याच्यांत व आपणांत कांहीं फरक नाहीं, किंवा आत्म्यास परमात्म्याच्या स्वरूपाप्रत पावतां येईल या अर्थानें नव्हे. तो पृथक रीतीनें वास करीत असतो. तो प्रेममय आहे. मी माझ्या स्नेह्यावर प्रीति कां करावी ? माझ्या कल्याणासाठीं नव्हे. माझें कल्याण होईपर्यंत माझी शाश्वति काय ? कोणत्या वेळीं काय होईल आणि काय नाहीं ह्याचा काय नेम आहे ? म्हणून मी माझ्या स्नेह्यावर प्रेम जें करावयाचें ते ह्या हेतूनें नव्हे, तर तसा माझा साहजिक धर्म आहे म्हणून. कारण सर्वांच्या ठिकाणीं अंतरात्म्याची एकता आहे. आणि प्रेममय


असणें हा त्याचा नैसर्गिक धर्म आहे. निर्लोभानें जी प्रीति जडलेली ती खरी प्रीति. कांहीं हेतु मनांत धरून एकाद्यावर कितीहि प्रेम केलें, तरी तें निर्लोभ नव्हे. तें खरें प्रेम नव्हे, 'मी व माझ्या प्रेमाचा, प्रीतीचा विषय एकच असें वाटलें पाहिजे. तरच ती प्रीति, किंवा तें प्रेम खरें म्हणतां येईल. अहंकारबुद्धीवर जितका आळा पडेल तितकी ही अशी शुद्ध प्रीति जास्त वाढण्याचा संभव आहे. अहंकारबुद्धीला अनुसरून असणारी प्रीति ही खरी पायाशुद्ध प्रीति नव्हे.

आपणांस नीतिमत्ता असावी असें वाटत असतें. पण असें कां वाटत असतें ? एक तर आपलें स्वतःचें कल्याण व्हावें म्हणून व दुसरें लोकांचें कल्याण व्हावें म्हणूनही आपणांस असें वाटत असतें. न्याय आपणांस कशास पाहिजे असतो ? मनुष्य दोषी आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याकरितांच आपल्याला त्याची आवश्यकता वाटत असते. पण, न्याय हा तो देणाऱ्याच्या कल्याणासाठीं नव्हे, व ज्याच्यासाठीं तो द्यावयाचा त्याचेही कल्याणासाठीं नव्हे, तर सर्वांच्या कल्याणासाठीं. नीतिमत्ता ही स्वार्थपरही नाहीं व परार्थपरही नाहीं. स्वार्थ व परार्थ ह्यांना परमात्म्याची एक गवसणी आहे. ती गवसणी लक्षांत ठेवून जी नीतीमत्ता, किंवा जें प्रेम, तें शुद्ध असणार. त्याचा पाया मजबूत. त्यामुळें स्वार्थचा स्वार्थपणा व परार्थाचा परार्थपणाही जावयास वेळ लागावयाचा नाहीं. हें भेद अवयवरूपानें आहेत खरें; परंतु ते एका झाडाच्या पानांप्रमाणें आहेत.

आपण परमेश्वराचे दास आहों; परमेश्वर आपलें कल्याण करितो वगैरे जे विचार आपणांत नेहमी वास करीत असतात, त्यांचें तरी कारण एकच आहे. तें असें की, आपल्या आत्म्याच्या कल्याणासाठीं ह्या सर्व गोष्ट असतात. आपणांस एकमेकांवर प्रेम ठेवावें असें वाटत असतें खरें. पण, तें प्रेम इतकें पायाशुद्ध असलें पाहिजे कीं, त्याच्यामुळें आत्म्यांत व परमात्म्यांत अंतर पडणार नाहीं. ज्या प्रेमामुळें आत्म्यांत व परमात्म्यात अंतर पडते, तें शुद्ध प्रेम नव्हे. परमेश्वरांत व आपणांत जेव्हां जेव्हां आपल्या वर्तनाच्या योगें अंतर पडले असें आपणांस वाटतें, तेव्हां तेव्हां तें आपलें वर्तन शुद्ध नव्हे असें समजावें. आपल्याठायीं वास्तव्य करणारा जो आत्मा त्याचा दिवसेंदिवस उत्कर्ष व्हावा, तो उन्नत दशेप्रत जावा, ह्या हेतूनें आपण सर्व गोष्टी करीत असलें पाहिजे. पण, ज्या गोष्टीनीं आपलें दैवी सामर्थ्य कमी होतें त्या गोष्टी शुद्ध नव्हत. अर्थात् त्यांच्यायोगें आपल्या आत्म्यास दिवसेंदिवस उन्नतावस्था प्राप्त होणार नाहीं असें समजावें.

मैत्रेयीनें आपल्या पतीजवळ जें अमरत्व मागितलें आहे त्याचा अर्थ काय ! आपण शरीर धारण केलेलें असावें; पण, त्याला नाश कधीही असूं नये, असा त्याचा अर्थ समजावयाचा काय ? ह्या अर्थानें मैत्रेयीनें हें वरप्रदान मागितलें आहे, असें

ह्या बृहदारण्यकोपनिषदांतील श्लोकावरून दिसत नाहीं. तशांतून मैत्रेयी ही साधणार स्त्रियांत मोडणारी स्त्री नव्हे. नाशवंत शरीर अविनाशी झाल्यानें आपल्या जीविताचें साफल्य झालें, असें तिला वाटणें शक्यच नव्हतें. तिनें वरप्रदान मागितलें त्याचा अर्थ हाच की, ईश्वराचा व माझा नेहमी सहवास असावा, कितीही विपत्ती आली, कशीही संकटें भोगावी लागलीं, तरी त्याच्या सहवासांत अंतर पडूं नये. ही जी स्थिति तिचें नांव अमरत्व. हें अमरत्व प्राप्त व्हावे, अशी याज्ञवल्क्याच्या स्त्रीनें इच्छा प्रदर्शित केली. आपले पृथक् पृथक् आत्मे एकमेकांवर प्रेम करींत असतात त्याचा तरी एक हाच मुख्य हेतु असतो कीं, परमात्मा व आत्मा ह्यांची संगति असल्यामुळें निरनिराळ्या आत्म्यांवर तरी प्रेम करून अशा निरनिराळ्या आत्म्यांचा जो परमात्मा त्याचें सान्निध्य घडावें, परमात्म्याचा व आपला दिवसेंदिवस जास्त जास्त सन्निवेश घडावा. परमात्म्याचा हा सन्निवेश घडावा. म्हणून जे जे प्रयत्न होत असतात त्यांत दांभिकपणा असूं नये. त्यांत कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ति असूं नये. बाहेरील सोवळें करून आंतील अशुद्धता नाहींशी होते व परमात्माशीं सहवास घडतो, असें ज्यास प्रामाणिकपणें वाटत असेल, त्यानें योग्य वाटल्यास वाटेल तितकें सोवळे करावें. पण, बाहेरच्या सोवळ्याचें मात्र वाटेल तितकें अवडंबर माजविलेलें, आणि अंतःकरणांतील अशुद्धता जशीच्या तशीच कायम, तर या अशा सोवळ्याचा कांहींच उपयोग नाहीं. तो केवळ दांभिकपणा झाला. म्हणून आपणांस जेणेंकरून परमेश्वराचें सान्निध्य दिवसेंदिवस अधिकाधिक होईल असें आचरण ठेवणें, हें आपलें कर्तव्य होय व त्याच्याच योगें आपणांस अमरत्व प्राप्त होणार आहे.



# आत्मज्ञान प्राप्त करून घ्या

**********************

—संत विनोबा

चातुर्वर्ण्याची कल्पना जरी बाजूस ठेवली तरीहि सर्व राष्ट्रांत, सर्वत्र, जेथें चातुर्वर्ण्य नाहीं तेथेंहि, स्वधर्म सर्वांना प्राप्त झालेला आहे. आपण सारे एका प्रवाहांत कांहीं एका परिस्थितीसह जन्मलों असल्यामुळें स्वधर्माचरणरूप कर्तव्य आपोआपच प्राप्त झालेलें असतें. म्हणून दूरचीं कर्तव्यें—तीं कर्तव्यें म्हणणें गौणच—कितीहि चांगलीं दिसलीं तरी तीं घेता कामा नयेत. पुष्कळवेळां दूरचें चांगलें दिसतें. मनुष्य दूरच्यावर भुलतो. मनुष्य उभा असतो तेथेंहि दाट धुकें असतें. परंतु तें जवळचें त्याला दिसत नाहीं व तो दूर बोट करून म्हणतो, “ तेथें धुकें दाट आहे.” तिकडचा मनुष्य ह्याच्याकडे बोट करून म्हणतो, “ तिकडे धुकें दाट आहे.” धुकें सर्वत्रच आहे. परंतु जवळचें दिसत नाहीं. मनुष्याला दूरचें आकर्षण वाटत असतें. जवळचे कोपऱ्यांत बसतें व लांबचें स्वप्नांत दिसतें परंतु हा मोह आहे. हा टाळलाच पाहिजे. प्राप्तस्वधर्म साधा असला, कमी वाटला, नीरस भासला, तरी जो मला प्राप्त तोच मला, तोच सुंदर, समुद्रांत बुडणाऱ्याला समजा एखादा ओबडधोबड ओंडका, तो जरी पॉलिश केलेला गुळगुळीत सुंदर नसला तरी तोच तारील. सुताराच्या कारखान्यांत पुष्कळ रेखीव व नक्षीचे ठोकळे असतील परंतु ते राहिले कारखान्यांत व हा येथें समुद्रांत बुडतो आहे. ह्याला तो ओंडका च जसा तारक, तो च धरला पाहिजे, त्याप्रमाणेंच जी सेवा मला प्राप्त झाली—ती जरी गौण वाटली तरी—तीच मला उपयोगी. तिच्यांतच मग्न होऊन राहाणें मला शोभतें त्यांतच माझा उध्दार आहे. दुसरी सेवा शोधायला जाईन तर तीहि जायची व पहिलीही ही जायची. अशामुळें सेवावृत्तीलाच मी आंचवतों. म्हणून स्वधर्मरूप कर्तव्यांत मन राहिलें पाहिजे.

स्वधर्मात मग्न झालें म्हणजे रजोगुण फिका पडतो. कारण चित्त एकाग्र होतें. स्वधर्मांव्यतिरिक्त तें कोठेंहि जात नाहीं. त्यामुळें चंचल रजोगुणाचा सारा जोरच जिरून जातो. नदी शांत व खोल असली म्हणजे कितीहि पाणी आलें तरी ती तें आपल्या पोटांत जिरवून घेते' स्वधर्माची नदी मनुष्याचें सारं बळ, सारा वेग, सारी शक्ति, जिरवूं शकते. स्वधर्मांत जितकी शक्ति वेंचाल तितकी थोडीच आहे. स्वधर्मांत शक्तिसर्वस्व ओता म्हणजे रजोगुणाची धांवपळ

करण्याची वृत्ति नाहींशी होईल. चंचलत्वाची नांगीच मोडल्यासारखें होईल. अशा-तऱ्हेनें रजोगुण जिंकावयाचा.

आतां उरला सत्वगुण. याच्याशीं फार जपून वागलें पाहिजे. याच्यापासून आत्म्याला अलग कसें करावयाचें ? सूक्ष्म विचाराची ही गोष्ट आहे. सत्त्वगुणाचा आजिबात निकाल नाहीं लावायचा. रज–तमांचा संपूर्ण उच्छेदच करावा लागतो. परंतु सत्त्वगुणाची भूमिका निराळी आहे. पुष्कळ समुदाय जमला आहे आणि त्याला काढून लावायचें आहे, तर कमेरच्यावर गोळया न झाडतां खाली पायांवर गोळया झाडा,' असा शिपायांना हुकूम देतात. यामुळें मनुष्य मरत नाहीं, परंतु घायाळ होतो. त्याप्रमाणें सत्त्वगुणाला घायाळ करावयाचें, ठार मारावयाचें नाहीं. रजोगुण व तमोगुण गेल्यावर शुद्ध सत्वगुण राहातो. शरीर आहे तोपर्यंत कोठल्या भूमिकेवर राहणें प्राप्त आहे. रज–तम गेल्यावर जो सत्वगुण राहणार त्याच्यापासून अलग व्हाव-याचें म्हणजे काय ?

सत्त्वगुणाचा अभिमान जडतो. तो अभिमान शुद्ध स्वरुपापासून आत्म्याला खालीं पाडतो. एखाद्या कंदिलांतील ज्योतीची प्रभा स्वच्छपणें बाहेर पडावी म्हणून आंतील काजळी पुसून टाकावी लागते. काजळी तर पुसून टाकली, परंतु कांचेवर धूळ बसली आहे तर तीहि पुसून टाकावी लागते. त्याप्रमाणें आत्म्याच्या प्रभेभोंवतीं जी तमोगुणाची काजळी असते ती झडझडून दूर केलीच पाहिजे. नंतर रजोगुणाची धूळहि साफ केली पाहिजे. तमोगुण धुतला, रजोगुण साफ केला. आतां शुद्ध सत्व-गुणाची कांच राहिली. हा सत्त्वगुणहि दूर करावयाचा म्हणजे कां कांच फोडायची ? नाहीं. कांच फोडल्यानें दिव्याचें कार्य होणार नाहीं. ज्योतीचा प्रकाश फांकण्यासाठीं कांच तर पाहिजेच. ही शुद्ध चकचकीत कांच फोडून न टाकतां, डोळे तिच्यामुळें दिपून जाऊं नयेत म्हणून लहानसा कागदाचा तुकडा आड धरावयाचा. डोळे दिपू द्यायचे नाहींत. सत्वगुण जिंकणें म्हणजे त्याबद्द-लचा अभिमान, त्याबद्दलची आसक्ति, दूर करणें सत्वगुणापासून काम तर करून घ्यायचें, परंतु जपून युक्तीनें घ्यायचें. सत्त्वगुणाला निरहंकारी करावयाचें.

हा सत्वगुणाचा अहंकार कसा जिंकावयाचा ? याला एक उपाय आहे. सत्वगुण आपल्या ठिकाणीं स्थिर करावयाचा. सत्वगुणाचा अभिमान सातत्यानें जातो. सत्वगुणाचीं कर्मे सतत करून तो स्वभावच करायचा. सत्वगुण कोणी घटकाभर आलेला पाहुणा, असें न होतां तो घरचा करून टाकावयाचा. जी क्रिया कधीं मधीं आपल्या हातून होते तिचा आपणांस अभिमान वाटतो. आपण रोज झोंपतों हें दुसऱ्यास सांगत बसत नाहीं. परंतु एखाद्या आजा-ऱ्याला पंधरा दिवसांत झोंप आली नाहीं व मग जर थोडी आली तर तो सर्वांना सांगतो. “ काल थोडी झोंप लागली बुवा. ” त्याला ती गोष्ट महत्वाची

वाटते. किंवा याहून अधिक चांगलें उदाहरण घ्यायचें तर श्वासोच्छ्वासाचें घेतां येईल. चोवीस तास सारखा श्वासोच्छ्वास चालला आहे. परंतु आपण तें येणाऱ्या जाणाऱ्याला सांगत नाहीं. "मी श्वासोच्छ्वास करणारा थोर प्राणी अशी प्रौढी कोणी सांगत नाहीं. हरिद्वारला गंगेंत सोडलेली काडी कलकत्त्यापर्यंत पंधराशें मैल वाहत गेली तर त्याची ऐट ती काडी मारणार नाहीं. ती सहज प्रवाहाबरोबर वाहत आली. परंतु कोणी भर पुरांत प्रवाहाविरुद्ध जर दहा हात पोहून गेला तर तो केवढी ऐट मारील ? सारांश, जी स्वाभाविक वस्तु आहे तिचा अहंकार वाटत नाहीं.

एखादें चांगलें कृत्य हातून झालें तर अभिमान वाटतो. कां ? कारण ती गोष्ट सहज झालेली नाहीं म्हणून. बाळयाच्या हातून एखादी चांगली गोष्ट झाली तर आई त्याच्या पाठीवरून हात फिरवते. नाहीं तर त्याच्या पाठीची व आईच्या काठीची सदा गांठ असावयाची. रात्रीच्या गाढ अंधारांत एखादाच काजवा असावा, मग त्याची ऐट काय विचारतां ! तो सारी चमक दाखवीत नाहीं. मध्येंच लुकलुकतो, मग थांबतो. पुनः लुकलुकतो. प्रकाशाची उघडझांप तो करीत असतो. त्याचा प्रकाश सतत राहील तर त्यांत ऐट राहणार नाहीं. सातत्यांत विशेष वाटेनासें होते. त्याप्रमाणें सत्वगुण आपल्या क्रियांतून जर सतत प्रकट होऊं लागला तर पुढें तो आपला स्वभावच होईल. सिंहाला शौर्याचा अभिमान नसतो, त्याला त्याची जाणीवहि नसते. त्याप्रमाणें सात्विक वृत्ति इतकी सहज होऊं दे कीं आपण सात्विक आहोंत याची स्मृतिहि होणार नाहीं. प्रकाश देणें ही सूर्याची नैसर्गिक क्रिया. तिच्याबद्दल त्याला अभिमान नसतो. सूर्याला जर त्याबद्दल मानपत्र द्यावयास गेलांत तर तो म्हणेल, "मी विशेष तें काय करतो ? मी प्रकाश देतो म्हणजे काय करतों ? प्रकाश देणें म्हणजेच माझें जगणें. प्रकाश न देईन तर मी मरेन. मला दुसरें माहितच नाहीं." हें जसें त्या सूर्याचें, तसें सात्विक मनुष्याचें झालें पाहिजे. सत्वगुण सर्व रोमरोमांत भिनवून घ्यावयाचा. सत्वगुणाचा असा स्वभावच बनला म्हणजे त्याचा अहंकार वाटणार नाहीं. सत्वगुण फिका पडण्याची, सत्वगुण जिंकण्याची ही एक युक्ति आहे.

आतां दुसरी युक्ति म्हणजे सत्वगुणाची आसक्ति सुद्धां सोडावयाची. अहंकार व आसक्ति या दोन निरनिराळ्या वस्तु आहेत. हा जरा सूक्ष्म विचार आहे. दृष्टान्तानें लवकर समजेल. सत्वगुणांचा अहंकार गेला तरी आसक्ति रहाते. श्वासोच्छ्वासाचेंच उदाहरण घेऊं. श्वासोच्छ्वासाचा अभिमान वाटत नाहीं. परंतु तेथें फार मोठी आसक्ति असते. पांच मिनिटें श्वासोच्छ्वास करूं नका म्हटलें तर होत नाहीं. नाकाला श्वासोच्छ्वासाचा अभिमान नसेल वाटत, परंतु हवा सारखी तें घेत असतें. सॉक्रेटिसाची गंमत आहे

ना. सॉक्रेटिसाचें नाक होतें फेंदरें. लोक त्याला हंसत. परंतु विनोदी सॉक्रेटिस म्हणे, "माझच नाक सुंदर आहे. मोठ्या नाकपुड्यांचें नाक भरपूर हवा आंत ओढून घेतें म्हणून तेंच सुंदर." तात्पर्य, नाकाला श्वासोच्छ्वासाचा अहंकार नाहीं,. परंतु आसक्ति आहे. सत्वगुणाची हि अशीच आसक्ति वाटते. उदारणार्थ—भूतदया. हा गुण अत्यंत उपयुक्त आहे. परंतु त्याच्याहि आसक्तीपासून दूर होतां आलें पाहिजे. भूतदया हवी परतु आसक्ति नको.

संत सत्वगुणामुळें इतरांना मार्गदर्शक होतात. त्यांचा देह भूतदयेमुळें सार्वजानिक झालेला असतो. माशा ज्याप्रमाणें गुळाला झांकोळून टाकतात त्याचप्रमाणें सारी दुनिया संतांवर प्रेमाचें पांघरूण घालते. संतांच्या ठायीं प्रेमाचा इतका प्रकर्ष होतो कीं अवघें विश्व त्याच्यावर प्रेम करतें. संत आपल्या देहाची आसक्ति सोडतात, परंतु सर्व जगाची आसक्ति त्यांच्या ठिकाणी जडते. सर्व जग त्यांच्या देहाला सांभाळूं शकतें. परंतु हीहि आसक्ति संतांनीं दूर केली पाहिजे. हें जें जगाचें प्रेम हें जें थोर फळ त्यापासून आत्मा अलग केला पाहिजे. मी कोणी विशेष, असें कधीं वाटतां कामा नये. अशाप्रकारें सत्वगुण अंगी पचवून टाकावा.

प्रथम अहंकार जिंकावा. मग आसक्ति जिंकावी, साधल्यास अहंकार जिंकतां येईल. फलासक्ति सोडून सत्वगुणामुळें मिळणारें फळहि ईश्वरार्पण करून आसक्ति जिंकावयाची. जीवनांत सत्वगुण स्थिर केल्यावर कधीं सिद्धीच्या रूपानें तर कधीं कीर्तिच्या रूपानें फळ पुढें उभे राहतें. परंतु ते फळहि तुच्छ लेखा. आंब्याचें झाड एकहि फळ स्वतः खात नाहीं. तें फळ कितीहि मोहक असो, रसाळ असो, तें फळ खाण्यापेक्षां न खाणेंच त्याला मधुरतर असते. उपभोगापेक्षां त्याग गोड आहे. धर्मराजाने जीवनांतील सर्व पुण्याईचें मिळणारें तें थोर स्वर्गसुखाचें फळहि शेवटीं लाथाडलें. जीवनांतील सर्व त्यागावर तो त्याने कळस चढविला तीं मधुर फळें चाखण्याचा त्याला हक्क होता. परंतु तो तीं चाखता तर संपतीं. "**क्षीणे पुण्ये मृत्यु लोकास येती**" हें चक्र पुनः त्याच्या पाठीस लागते. धर्मराजाचा केवढा हा त्याग! तो सदैव माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. अशा रीतीनें सत्वगुणाचें सतत आचरण करून त्याचा अहंकार जिंकून घ्यावा. तटस्थ राहून सर्व फळे ईश्वराला अर्पून त्याची आसक्ति जिंकून घ्यावी, म्हणजे सत्वगुण जिंकला असें होईल.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबावांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** by R. S. Harshid Mehta | | | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** (Eng.) Calcutta | | | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** (English) | | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1–00 |
| (2) | ,, ,, ,, $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | 00–37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.

January 1965 Regd. No. B 7989



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, फ्लॅट नं. ८०४ बी. दादर. मुंबई १४